सभापतीस्थानी माननीय सभापती

प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहाबाहेर निघून जातात.)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये सूचना दिलेली आहे, ती त्यांनी मांडावी.

श्री. जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, "अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील कमळपाडा (शहाबाज) येथे रुपये 2 कोटीची स्वजलधारा पाणीपुरवठा याजना कार्यान्वित होऊन या योजनेतून फूकट पाणी न मिळाल्याने दि. 16 मार्च, 2008 रोजी होणाया ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीवर गावच्या पंचांनी प्रभाग क्रमांक 2 मध्ये बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला. ज्या पंचांनी असा निर्णय घेतला त्यांनी मात्र आपल्या मर्जीतील 3 उमेदवार दुसऱ्या प्रभागातून या प्रभागासाठी उमेदवार म्हणून उभे केले. ज्याअर्थी पंचांच्या विरुध्द या प्रभागात एकूण 7 उमेदवारांनी अर्ज दाखल केले त्यांच्याविरुध्द बहिष्कार टाकून त्यांना वाळीत टाकण्याचा निर्णय पंचांनी घेतला. तरी देखील रविवार दि. 16.3.2008 रोजी 252 लोकांनी मतदान करुन निवडणुकीच्या कामास योग्य ते सहकार्य केले. पंचांनी ज्या उमेदवारांना वाळीत टाकले त्यापैकी श्री. दिवाकर गोपाळ पाटील यांनी दि. 23 मार्च, 2008 रोजी तुकाराम बीज उत्सवानिमित्त दि. 22 मार्च, 2008 रोजी सार्वजनिक गावकीच्या भांडयाची मागणी केली असता त्यास तुम्हाला वाळीत टाकले आहे असे सांगून भांडी देण्यास पंचांनी नकार दिला. तसेच दि. 22 मार्च, 2008 रोजी पंचांकडील लोकांनी वाळीत टाकलेल्या लोकांच्या घरावर दगडफेक करुन नवरात्र उत्सव मंडळाच्या मंडपासह सुमारे 15 घरांचे मोठया प्रमाणात नुकसान केले आहे. नुकसान झालेल्या घरांचे फोटोसह पुरावे कॅसेटच्या स्वरुपात माझ्याकडे उपलब्ध आहे.

या ठिकाणी दि. 6 एप्रिल, 2008 ते दि. 13 एप्रिल, 2008 या कालावधीत राम नवमीचा उत्सव मोठया प्रमाणात साजरा होतो. पंचांच्या वरील निर्णयाबाबत योग्य ती दखल घेऊन त्यांच्या विरुध्द कारवाई होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने मोठा प्रसंग निर्माण होण्याची शक्यता आहे, म्हणून या गावाला सुरक्षा देणे आवश्यक आहे. या तातडीच्या व अतिशय गंभीर विषयावर चर्चा करण्यासाठी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या महत्वाच्या,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.....

जिव्हाळयाच्या तसेच ज्वलंत विषयावर चर्चा करण्यात यावी. तसेच ज्या पोलिसांच्या समोर दगडफेक करण्यात आली त्याबाबत पोलिसांनी काहीच कारवाई केली नाही याबाबत संबंधित पोलिसांवर कारवाई करण्यात यावी व यासंबंधीची चर्चा सभागृहात घ्यावी," अशी मी विनंती करतो.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 चा प्रस्ताव दिलेला आहे. त्यासंबंधीचा उल्लेख आजच्या कामकाज पत्रिकेवर कुठेही नाही. याबाबतीत त्यांनी जे मुद्दे मांडले आहेत, त्याबाबतीत मी त्यांना माझ्या दालनात बोलावून हा विषय नियम 93 अन्वये घेता येईल की नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेच्या स्वरुपात घेता येईल यासंबंधीचा निर्णय घेण्यात येईल. अत: मी सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या नियम 289 च्या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

राज्यात अपघाती मृत्यूमध्ये वाढ झाल्याबाबत

(1) * **37897** श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त, श्री. गोविंदराव आदिक, श्री. सुरेशदादा देशमुख, श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्री.सय्यद जामा , श्री.राजन तेली, श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री. शरद रणपिसे , श्री. सुधाकर गणगणे, श्री. दिवाकर रावते, श्री. मधुकर सरपोतदार, श्री. अरविंद सावंत, श्री. अनिल परब, डॉ. निलम गोऱ्हे, श्री. गोपीकिसन बाजोरिया, श्री. सुरेश जेथलिया, श्री.परशुराम उपरकर, श्री. किसनचंद तनवाणी, श्री. जयंत पाटील, प्रा. शरद पाटील : सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो ने जाहिर केल्यानुसार रस्त्यावरील वाहनामुळे होणाऱ्या अपघाती मृत्यूमध्ये देशात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक लागत असून रस्त्यावरील वहान अपघातामध्ये महाराष्ट्रात सन 2006 मध्ये 57 हजार पेक्षा जास्त व्यक्तींचा मृत्यू झाला असून गेल्या वर्षभरात राज्यात दहा हजार जणांचा रस्ता अपघात मृत्यू झाल्याची खळबळजनक बाब दिनांक 2 जानेवारी, 2008 वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, ठाणे जिल्ह्यात रोज 589 नवीन वाहनांची भरपडत असल्याने वाहतूक समस्या अत्यंत गुंतागुंतीची झाली असल्याने वाहन अपघातात गेल्या वर्षभरात 1200 जणांचा बळी गेला आहे, मुंबई पोर्ट ट्रस्टची क्षमता दुप्पटीने वाढविण्याचा निर्णय झाल्यानंतर 1200 हेक्टर जमीन ताब्यात घेवून जेएनपीटीची क्षमता वाढविण्याच्या हालचाली सुरु झाल्यामुळे ठाणे जिल्ह्यातून ये-जा करणाऱ्या वाहनांची संख्या सुमारे 85 लाखांनी वाढणार आहे असे दिनांक 1 जानेवारी, 2008 वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, तसेच कल्याण-शिळफाटा रस्त्यावर अवजड वाहनांनी गेल्या दोन वर्षात 118 जणांचा बळी घेतला असल्याने या मार्गावरील या अवजड वाहनांची वाहतूक अन्य मार्गे वळविण्यात यावी किंवा या वाहनांसाठी रात्री 12 ते 5 ही वेळ निश्चित करावी अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, राज्यातील अपघाताचे वाढते प्रमाण रोखण्यासाठी अपघातप्रवण क्षेत्र व कारणे शोधून त्यावर उपाययोजनांची गरज असल्याने त्या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37897.....

(4) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) अंशत: खरे आहे.

राज्यात रस्त्यावरील वाहन अपघातामध्ये सन 2006 मध्ये 57 हजारांपेक्षा जास्त व्यक्तींचा मृत्यू झाला नसून एकूण 11.271 लोक मृत्युमुखी पडले आहेत. गेल्या वर्षभरात 10 हजार व्यक्तींचा रस्ता अपघातात मृत्यू झाला आहे.

(2) ठाणे जिल्ह्यात सन 2007 मध्ये 651 लोक रस्त्यावरील वाहन अपघातात मृत्युमुखी पडले आहेत. तसेच कल्याण शिळफाटा रस्त्यावर गेल्या दोन वर्षात 59 लोक मृत्यूमुखी पडले आहेत.

कल्याण शहरात रात्री 10 ते सकाळी 6 या वेळेतच अवजड वाहनांस प्रवेशास परवानगी आहे.

(3) महाराष्ट्र राज्यातील अपघातप्रवणक्षेत्रे ही 1) तीव्र वळणे 2) नागमोडी वळणे 3) अरुंद पुल 4) तीव्र चढण/उतार 5) फाटकाविना रेल्वे क्रॉसिंग इ.कारणामुळे निर्माण झाली आहेत.

तसेच अपघात प्रवणक्षेत्राबाबत दक्ष करणाऱ्या चिन्हांच्या फलकाकडे दुर्लक्ष केल्याने अपघात घडले आहेत. असे अपघात रोखण्यासाठी वाहतूक कायदा व नियम यांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संपूर्ण राज्यात सुरक्षा सप्ताह आयोजीत करुन 1) वाहन चालक, स्थानिक लोक, विद्यार्थी यांच्यामध्ये वाहतूकीचा कायदा व नियम याबाबत जनजागृती केली जाते.

2) वाहनचालकांची नेत्र तपासणी उच्च रक्तदाब व मधुमेह याबाबत वैद्यकीय चाचणी करण्यात येऊन त्यांना मोफत चष्मे वाटप व औषधोपचार करण्यात येतो.

(3) वाहनांवर रिप्लेक्टर लावण्याबाबत जनजागृती करण्यात येते.

तसेच महत्वाचे जंक्शनवर सिग्नल, झेब्रा क्रॉसिग पट्टे, वाहतूक चिन्हे बसवण्यात येऊन, अपघातप्रवण क्षेत्राजवळ भुयारी मार्ग व उड्डाणपुल बांधण्यात आले आहेत.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37897.....

श्री. मुजफ्फर हुसेन : महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, गेल्या वर्षभरात 10 हजार व्यक्तींचा रस्ता अपघातात मृत्यू झाला आहे. याचा अर्थ अशा प्रकारे अपघातात मृत्यू होत असल्याचे शासनानेही मान्य केले आहे. माझा प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे अपघातातील मृत्यू टाळण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ? त्याचबरोबर राज्याच्या सर्व महामार्गांवर एकूण किती ॲम्बुलन्स आणि डॉक्टरांची व्यवस्था केली आहे ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 37897.....

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : माननीय सभापती महोदय, मागील वर्षभराच्या काळामध्ये रस्त्यांच्या अपघातामध्ये 10 हजार लोक मृत्युमुखी पडलेले आहेत ही वस्तुस्थिती आहे. या अपघातांची विविध कारणे आहेत. 90 टक्के अपघात हे प्रामुख्याने ड्रायव्हरच्या चुकीने होत असतात तसेच 10 टक्के अपघात हे रस्ते आणि इतर कारणामुळे होत असतात असे सिध्द झालेले आहे. अपघात होऊ नये म्हणून महामार्ग पोलिसांकडून खालील प्रमाणे उपाययोजना केल्या जात असतात. महामार्गांच्या रुंदीकरणाची आवश्यकता. मागील वर्षापेक्षा या वर्षी रस्ते रुंद केल्यामुळे मागील वर्षापेक्षा या वर्षी अपघातांचे प्रमाण कमी झालेले आहे. त्यामुळेच आपण मोठया प्रमाणात रस्तेरुंदीकरणांची कामे हाती घेतलेली आहेत. महामार्गावरील वळण रस्ते सुधारण्यांची आवश्यकता. वळण असल्यामुळेही अपघातांच्या संख्येत वाढ होत असते. जागेअभावी किंवा जागेच्या अडचणीमुळे वळण रस्ते तयार करावे लागत असतात. वळण रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी व्हावे यासाठी वळण रस्त्यावर भिंत बांधणे तसेच इत्यादी कामे करण्यात येत आहेत. महामार्गावर सूचना फलक लावण्यात आलेले आहेत. जेणे करुन फलकावर वाहन चालकाचे लक्ष गेल्यावर त्याला समजेल की, हा अपघाताचा रस्ता आहे त्यामुळे वाहन चालक वाहन सांभाळून चालवू शकेल. मध्य रेषा रंगवणे, रस्त्याच्या कडेला रेडीअम लावणे इत्यादी सुरक्षेचे उपाय योजण्यात आलेले आहेत. घाटातील वळणाचे रस्ते आतील बाजूस रुंद करणे, घाटाच्या बाहेरील बाजूस भिंतीचे कठडे तयार करणे, रस्त्यालगत येणारे टेलिफोनचे खांब, विजेचे खांब, झाडाच्या फांद्या काढून टाकणे, नदी-नाल्यावरील पुलांची रुंदी वाढवणे, धोक्याच्या वळणावर "धोक्याचे वळण" असे फलक लावणे अशी कामे करण्यात आलेली आहेत.

सभापती : पुष्कळ लांब यांदी असेल तर सन्माननीय मंत्रीमहोदयांनी यादी पटलावर ठेवण्यास हरकत नाही.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : ठीक आहे. सदर यादी मी आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवत आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 37897.....

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेवर सर्वात जास्त अपघात होत असतात. हा वेस्टर्न एक्सप्रेस हायवे मुंबई ते गुजरात असा आहे. मुंबई पासून डहाणू पर्यंतच्या संबंध पट्टयामध्ये हायवेवर कोणतीही आरोग्य सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे शासन वसईजवळ सुसज्ज ट्रोमा इस्पितळाची सोय करणार का? या वेस्टर्न एक्सप्रेस हायवेचे रुंदीकरण करण्यात आलेले असून सुध्दा या ठिकाणी अपघातांचे प्रमाण कमी झालेले नाही. रुंदीकरणाबरोबर या वेस्टर्न एक्सप्रेस हायवेवर इस्पितळाची सोय होणे आवश्यक आहे. अपघात झाला तर मुंबईमध्ये रुग्णांना आणण्यास विलंब होत असतो त्यामुळे वसई जवळ सुसज्ज असे ट्रोमा हॉस्पिटल बांधण्यात येईल काय?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे संबंधित रस्त्यावर हॉस्पिटलची उभारणी करता येईल का हे बघण्यात येईल किंवा या ठिकाणी ॲम्ब्यूलन्सची तरी निदान सोय करण्यात येईल.

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37897..

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मुंबई - गोवा हा नॅशनल हायवे क्रमांक 17 हा अरुंद असून त्या ठिकाणी सतत अपघात होत असल्यामुळे तो भाग मृत्यूचा सापळा बनलेला आहे. या हाय वे वरुन ट्रेलर्सची वाहतूक मोठया प्रमाणावर होत असते. त्यासाठी रस्ता रुंद असावा लागतो परंतु अनेक ठिकाणी अरुंद रस्ता असल्यामुळे तसेच अनेक ठिकाणी वळणे असल्यामुळे तेथे सतत अपघात होत असतात. एखाद्या वेळी अपघात झाला असेल तर त्यात जखमी झालेल्या व्यक्तीवर औषधोपचार करण्यासाठी तसेच हॉस्पिटलची तेथे कोणतीही सोय नाही. आज जी काही प्रमाणात सोय करण्यात आलेली आहे ती कोणत्या ठिकाणी करण्यात आलेली आहे. त्याचबरोबर या हाय वे वर जेथे सतत अपघात होतात तेथे मृत्यूचे सापळे बनलेले आहे ते सापळे बंद करण्यासाठी या रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामाची प्रगती कोठ पर्यंत आलेले आहे आणि हे काम केव्हा पूर्ण करण्यात येणार आहे ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय,या प्रश्नाचे उत्तर मी देऊ इच्छितो. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मुंबई - गोवा हाय वेच्या संदर्भात आणि त्या हाय वे वर होणाऱ्या अपघाताच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्या बाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, मुंबई - गोवा हाय वे हा केन्द्र सरकारचा आहे. या हाय वे चे चौपदरीकरण करण्याच्या बाबतीत तीन चार वेळेला दिल्ली येथे बैठका झाल्या होत्या ही गोष्ट खरी आहे.त्या पैकी एका बैठकीसाठी माननीय केन्द्रीय कृषी मंत्री श्री शरद पवार सुध्दा उपस्थित होते आणि त्यांनी असे सांगितले होते की, या रस्त्यावरुन पर्यटकांची वाहतूक मोठया प्रमाणावर होत असते त्याचबरोबर दक्षिण भारतात जाणाऱ्या आणि तेथून येणा-या गाडयांची वाहतूक होत असते त्याचप्रमाणे हल्ली केवळ ट्रक्स आणि कार या वाहनापुरतीच वाहतूक मर्यादित राहिलेली नाही तर मोठया गाडया, मल्टी ॲक्सल्स आणि ट्रेलर्स देखील या हायवेवरुन जात येत असतात. या रस्त्यावरील वाहतूक एवढी असते की एक गाडी जात असतांना दुसऱ्या गाडीला ओव्हर टेक करता येत नाही. त्यामुळे या रस्त्याचे चौपदरीकरण करण्यात यावे यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केलेला आहे. या प्रश्नाच्या संदर्भात तारीखवार माहिती मी आणलेली नाही पंरतु सात आठ महिन्यापूर्वी या संदर्भात जी बैठक घेण्यात आली होती त्या बैठकीत असा निर्णय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेण्यात आला होता की, या रस्त्याचे चौपदरीकरण करणे गरजेचे आहे. त्यानंतर पुढची कार्यवाही अशी झाली होती की, गोव्याच्या बाजूने रस्त्याचे रुंदीकरण आणि मुंबईच्या बाजूने देखील या रस्त्याचे रुंदीकरण करण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला आहे. गोव्याच्या बाजूने झारापत्रादेवी पर्यंत रुंदीकरण करण्याचे काम सुरु करण्यात आले होते परंतु ते काम पूर्ण झालेले नाही. 150 कोटी रुपयांच्या या कामाला सुरुवात झालेली आहे. मुंबईच्या बाजूने या रस्त्याचें चौपदरीकरण करण्याच्या कामाचा अभ्यास करण्यासाठी केन्द्रीय मंत्री मंडळाने त्यांच्या एक्सपर्टसना, कन्सलटंटसना आदेश दिलेले आहेत. पनवेल - इंदापूर हे 84 किलोमिटर्स चौपदरीकरण करण्याचे डी.पी.आर. चे काम मंजूर केलेले आहे. तसेच झारापत्रादेवी पर्यंतचे 21 किलोमिटर्स चौपदरीकरणाचे काम आता सुरु झालेले आहे . डी.पी.आर मंजूर झाल्यानंतर त्या कामाचे टेन्डर काढणे ,इतर प्रक्रिया करणे इत्यादी कामे केन्द्र सरकार मार्फत होणार आहे. उरलेल्या रस्त्याच्या चौपदरीकरणाच्या कामासंबंधी सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश केन्द्र सरकारने त्यांच्या अधिकाऱ्यांना दिलेले आहेत.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37897 ...

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. या समस्येवर तोडगा काढण्याच्या दृष्टिकोनातून शासनाने ज्या उपाय योजना केलेल्या आहेत त्या अपुऱ्या पडत आहेत. नॅशनल क्राईम ब्युरोने जाहीर केल्यानुसार रस्त्यांवर होणाऱ्या अपघाती मृत्यूंमध्ये देशात महाराष्ट्राचा पहिला क्रमांक लागतो म्हणून अपघाताचे प्रमाण आणखी कमी करण्याच्या दृष्टीने अधिक परिणामकारक उपाययोजना किंवा ठोस उपाय शासन करणार आहे काय ? तसेच आता सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन यांनी म्हटल्याप्रमाणे त्या ठिकाणी हायवेंवर अपघात होत आहेत ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारे अपघातग्रस्तांना फर्स्टएडची सुविधा उपलब्ध नसते हेही तितकेच खरे आहे. त्यामुळे ज्या सामाजिक, खाजगी संस्था आहेत त्यांच्याशी टायअप करून राज्यातील सर्व हायवेंवर ॲम्ब्युलन्सची व्यवस्था आपण करणार काय ? सभापती महोदय, त्यानंतर माझा दुसरा प्रश्न असा आहे की, कल्याण-शीळफाटा रस्त्यावर रात्री 10 ते सकाळी 6 वाजेपर्यंत हेवी ट्राफिक सोडली जात आहे. त्याबाबत तेथील जनतेने वारंवार आपल्याला विनंती केली आहे की, ही वेळ रात्री 12 ते पहाटे 5 वाजेपर्यंत करण्यात यावी. तरी शासन याबाबत जनतेला न्याय देईल काय ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सांगितले की, हायवेंवर अपघात होतात आणि अशा वेळी अपघातग्रस्तांना प्राथमिक उपचार वेळेवर मिळत नाहीत म्हणून त्या ठिकाणी विविध खाजगी संस्था, एनजीओज् किंवा उद्योगपती वा उद्योगांचे सहकार्य घेऊन ॲम्ब्यूलन्सची सोय करणार काय ? असा प्रश्न विचारला आहे. सन्माननीय सदस्यांची सूचना चांगली आहे, त्याबाबत संबंधितांशी चर्चा करून जेथे जास्त अपघात घडतात तेथे अशा प्रकारची सोय भविष्यात करून देण्याच्या दृष्टीने निर्णय घेतला जाईल. तसेच कल्याण-शीळफाटा रस्त्यावर हेवी ट्राफिक आहे आणि तेथे रात्री 10 ते सकाळी 6 वाजोपर्यंतच्या काळात ही हेवी व्हेइकल्स ट्राफिक करण्यास आपण परवानगी दिलेली आहे. ही वेळ बदलून रात्री 12 ते पहाटे 5 वाजेपर्यंतची करावी अशी जी सूचना त्यांनी केली आहे त्याबाबत संबंधित विभागाला सूचना देण्यात येतील.

..... डी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, प्रश्न 2 मध्ये प्रामुख्याने जेएनपीटी आणि मुंबई पोर्ट ट्रस्टची क्षमता दुपटीने वाढली आहे या संदर्भात प्रश्न विचारलेला आहे. खरे तर हा प्रश्न परिवहन विभागाशी संबंधित असल्याने त्या विभागाच्या मंत्र्यांनी यावर उत्तर दिले पाहिजे. परंतु गृह राज्यमंत्री यावर उत्तर देत असल्याने त्या प्रश्नाला समाधानकारक उत्तर मिळत नाही असे मला वाटते. अर्थात ही शासनाची संयुक्त जबाबदारी आहे हे मान्य करून मी प्रश्न विचारतो की, जेएनपीटी आणि मुंबई पोर्ट ट्रस्टची क्षमता जवळपास चौपटीने वाढणार आहे पण त्या पटीने तेथील रस्त्याची क्षमता वाढविली जात नाही. तेव्हा त्या दृष्टीने आपण तेथील रस्त्यांची क्षमताही वाढविण्याचा विचार करणार का ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, याबाबत तेथे काही काम झालेले आहे तर काही काम सुरू आहे. सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले आहे त्याचा गंभीरतेने विचार करून तेथे जे काही करता येणे शक्य आहे ते निश्चितपणे केले जाईल.

श्री. सुरेश नवले : सभापती महोदय, वाहनांच्या गतीवर आपण काही प्रतिबंध ठेवला आहे काय ? कारण हायवेवरून 120-140 पेक्षा अधिक गतीने वाहने जात असल्याने अपघात होत असतात हे लक्षात घेऊन वाहनांच्या गतीवर आपण प्रतिबंध लावणार आहात का ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : त्यादृष्टीने सगळीकडे बोर्ड लावले आहेत की, या रस्त्यावर अमुक इतक्या गतीने जावे. काही ठिकाणी 80 तर काही ठिकाणी 60 ची गती दाखविलेली आहे. तसेच अन्य धोक्याच्या सूचनांचे फलक देखील लावलेले आहेत.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मी नेमका प्रश्न विचारला होता की, राज्याच्या सर्व महामार्गांवर शासनाच्या वतीने किती ॲम्ब्युलन्स आणि डॉक्टर्सची व्यवस्था केलेली आहे ?

श्री. सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, आज राज्यातील सर्व हायवेंच्या ठिकाणी एकंदर 21 ॲम्ब्युलन्स आहेत त्यात 12 खाजगी आहेत आणि जीपमध्ये 51 तर कार्समध्ये 7, क्रेन्स 12, मोटारसायकल्स 183 अशी एकूण वाहने प्राथमिक उपचारार्थ आपण उपलब्ध करून दिलेली आहेत.

***

(यानंतर श्री. सरफरे .... इ 1 ..

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

राज्य शासन राबवित असलेल्या रोजगार हमी योजनेअंतर्गत अनेक त्रुटी आढळून आल्याबाबत

(२) * ३७६७५ श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त : सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यशासन राबवित असलेल्या "रोजगार हमी योजने" अंतर्गत अनेक त्रुटी आढळून येत आहेत. त्याचप्रमाणे इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्य शासनाचे व्यवस्थापन अतिशय खराब आहे, हि गोष्ट खरी आहे काय,

(२) असल्यास, या व्यवस्थापनेतील त्रुटी सुधारण्याकरीता केलेल्या उपाय योजनांचा तपशील काय आहे,

(३) सदर उपाय योजनांच्या अंमलबजावणीच्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.हर्षवर्धन पाटील : (१),(२) व (३) रोहयो / मग्रारोहयो अंतर्गत घेतलेल्या कामांच्या नियमित तपासणी व लोकप्रतिनिधींनी केलेल्या तक्रारीच्या चौकशीत काही त्रुटी / अनियमितता आढळून आल्यास त्रुटीचे निराकरण करण्यासंदर्भात उचित कार्यवाही केली जाते. तसेच आवश्यकते नुसार संबंधीत अधिकारी / कर्मचारी यांच्यावर शिस्तभंग विषयक कार्यवाही देखील केली जाते. त्याचप्रमाणे शासन स्तरावरुन वेळोवेळी सुचना, परिपत्रके, शासननिर्णय काढून योजनेची अंमलबजावणी नियमाप्रमाणे होण्याकरिता शासन स्तरावर लक्ष दिले जाते. रोहयो / मेग्रारोहयो अंतर्गत मजूरीच्या दरात वाढ केलेली असून, मापदंडात सुधारणा करण्यात आली आहे. मग्रारोहयोची अंमलबजावणी योग्यरितीने होण्यासाठी राज्यशासनाने ग्रामपंचायत स्तरावर पदाधिकारी व शासकीय अधिकारी / कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाचा धडक कार्यक्रम आखला असून, तीन लाख व्यक्तिना आतापर्यंत प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच भिंती फलके, जाहीराती इत्यादींद्वारे प्रसिध्दी करुन योजनेची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात येत आहे.

श्री. सय्यद जामा : सभापति महोदय, लिखित उत्तर में कहा गया है कि महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना के अन्तर्गत त्रुटि का पता चलने पर उसका निराकरण करने के लिए उचित कार्यवाही की जाती है. लेकिन मैं इस संबंध में यह कहना चाहता हूं कि यह जनरल उत्तर है, स्पेसिफिक उत्तर नहीं है. क्योंकि यह नहीं बताया गया है कि त्रुटि के संबंध में सरकार ने क्या क्या कदम उठाए हैं. अभी भी रोजगार हमी योजना और महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना में

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तफावत है और दूसरी बात यह है कि ग्रामीण क्षेत्र में बहुत सारे लोगों को काम नहीं मिल रहा है. क्या इस संबंध में मंत्री महोदय विशेष जानकारी देंगे ?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सुरुवातीला आपल्या महाराष्ट्रातील 12 जिल्हयामध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना हाती घेतली होती. नंतरच्या काळात 6 जिल्हयांचा या योजनेमध्ये समावेश करण्यात आला. दिनांक 1 एप्रिल 2008 पासून महाराष्ट्रातील 33 जिल्हयांमध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु करण्याचा कार्यक्रम केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्य सरकारने घेतला आहे. सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केल्याप्रमाणे ही गोष्ट खरी आहे की, गेल्या दोन वर्षामध्ये रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुरांची उपस्थिती ही मागील काही वर्षीच्या तुलनेत कमी आहे. परंतु गेली तीन वर्षे सातत्याने अतिवृष्टी होत असल्यामुळे, सातत्याने पाऊस पडत असल्यामुळे ग्रामीण भागामध्ये रोजगार हमी योजनेच्या मजुरांच्या माध्यमातून कामाची तेवढी मागणी करण्यात आलेली नाही. तथापि, आज जवळपास 2 लाख 12 हजारापेक्षा अधिक मजूर रोजगार हमी योजनेच्या कामावर उपस्थित आहेत. आता यापुढे एम.आर.ई.जी.एस. च्या माध्यमातून 50 टक्के कामे जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायतीच्या माध्यमातून करण्याचा निर्णय घेतला आहे. 50 टक्के कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले आहेत, आणि 50 टक्के मंजूरीचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द केले आहेत. या योजनेच्या माध्यमातून जवळपास 9960 ग्राम रोजगार सेवकांना तांत्रिक प्रशिक्षण देऊन त्यांची नेमणूक केली आहे. तांत्रिक मनुष्य बळासाठी 1243 लोकांची नेमणूक केली आहे. रोजगार हमी योजनेच्या कामासाठी निधीची अडचण नाही. परंतु ही डिमांड ग्रिव्हन्स स्कीम असल्यामुळे ज्याठिकाणी कामाची गरज आहे त्याठिकाणी काम उपलब्ध करुन देण्याची तयारी शासनाने केली आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी आपण ग्रामपंचायतीच्या स्तरावर पदाधिकारी आणि कर्मचा-यांना चांगल्या प्रकारे प्रशिक्षण देत आहात. या योजनेमध्ये आमदार आणि लोकप्रतिनिधी यांचा सहभाग येणार आहे. या योजनेची अंमलबजावणी होण्यासाठी शासनाच्या अधिकाऱ्यांकडे आपल्याला सातत्याने

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संपर्क साधावा लागणार आहे. ही योजना प्रभावीपणे राबविण्याकरिता आपण ज्या पध्दतीने पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देत आहात तसे प्रशिक्षण आमदारांनाही देण्याची गरज आहे. याचे कारण आम्हाला ही योजना खऱ्या अर्थाने समजली नाही. या योजनेची माहिती होण्यासाठी या अधिवेशन काळात आमदारांकरिता प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येईल काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, नव्याने सुरु झालेल्या राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे महाराष्ट्र राज्य हे जनक आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये ही योजना 1972 साली सुरु करण्यात आली. आणि आता केंद्र सरकारने राज्य सरकारच्या मदतीने राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.त्यामुळे माननीय सदस्य म्हणत आहेत त्याप्रमाणे आमदारांना या योजनेची माहिती नाही असे होणार नाही. गेली 32 वर्षे....

श्री. भास्कर जाधव : आपण ज्या प्रमाणे ग्रामपंचायतीच्या स्तरावर पदाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देत आहात....

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, एम.आर.ई.जी.एस.च्या माध्यमातून ही योजना सुरु झाली आहे. या योजनेमध्ये एकच फरक आहे की, या योजनेमध्ये आपल्याला 100 दिवस काम देता येईल अशाप्रकारची अट आहे. दुसरी अट अशी आहे की, 50 टक्के कामे ग्रामपंचायतीने करावीत, तिसरी अट वैयक्तिक स्वरुपाची कामे आजपर्यंत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून फलोत्पादन योजना, जवाहर विहिर योजना, शेततळयाची योजना राबवीत होतो. तशाप्रकारची योजना एम.आर.ई.जी.एस. मधून घेऊ शकत नाही. त्या संदर्भात 100 दिवसांचा कार्यक्रम एम.आर.ई.जी.एस. मध्ये घेण्याचे मान्य केले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37675 . . . . .

श्री.हर्षवर्धन पाटील . . . .

उर्वरित 265 दिवसामध्ये मजुरांकडून कामाची मागणी आली तर ती कामे आपल्या स्टेट-ईजीएस मधून घेण्यात यावीत. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली आहे, ती मान्य आहे. त्यांनी असे सांगितले की, या योजनेच्या संबंधात सन्माननीय सदस्यांना सर्व माहिती देण्यासाठी अधिवेशनाच्या काळामध्ये एक बैठक घेण्यात यावी. मी याबाबतीत सांगू इच्छितो की, अशा प्रकारे निश्चितपणे बैठक घेतली जाईल आणि या योजनेच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांच्या मनातील सर्व शंका-कुशंका दूर करण्यात येतील. मला सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांच्या बरोबरच विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांना सुध्दा विनंती करावयाची आहे की, त्यांनी या बैठकीसाठी उपस्थित रहावे. एम.आर.ईजीएस, ही योजना खऱ्या अर्थाने तळागाळातील लोकांपर्यंत पारदर्शीपणे राबविण्यासाठी या सदनातील सर्व सन्माननीय सदस्यांचे सहकार्य आवश्यक आहे. त्यामुळे यासंदर्भात निश्चितपणे एक बैठक घेतली जाईल.

श्री.सय्यद जामा : सभापती महोदय, मंत्री महोदय ने अभी बताया कि 1 अप्रैल, 2008 से महाराष्ट्र के 33 जिलों में एम.आर.ई.जी.एस. लागू की जाएगी. इस योजना के अन्तर्गत मजदूरों को 100 दिन रोजगार दिया जाएगा. मैं यह जानना चाहता हूं कि रोजगार हमी योजना के अन्तर्गत " मागेल त्याला काम " दिया जाता था, तो यह योजना शुरु रहेगी या नहीं ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, एमआर-ईजीएसची योजना 100 दिवसांसाठी आहे आणि 1 एप्रिल पासून राज्यातील सर्व 33 जिल्हयांमध्ये या योजनेची सुरुवात करीत आहोत. ज्या वेळेस 100 दिवसांचा कार्यक्रम पूर्ण होईल आणि त्यानंतर जर त्या मजुराला कामाची गरज असेल तर अशा वेळी आपण आपल्या रोजगार हमी योजनेमध्ये कोणताही बदल केलेला नाही, ती योजना बंद केली जाणार नाही. मागेल त्याला काम, अगदी 365 दिवस जरी काम मागितले तरी ते देण्याची आमच्या विभागाची तयारी आहे.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, रोजगार हमी योजनेची सुरुवात झाल्यानंतर एक गोष्ट पहावयास मिळाली की, शेतकऱ्यांच्या शेतावर काम करण्यासाठी मजूर मिळत नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना फार मोठया अडचणीला सामोरे जावे लागत आहे. सदनामध्ये मागच्या वेळेला हा प्रश्न विचारण्यात आला होता. तसेच याबाबतीत इतर वेळी देखील चर्चा झालेली आहे. माझा प्रश्न असा

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एन.पी.हिराणी.....

आहे की, शेतावर काम करणारे जे मजूर आहेत, त्यांच्यासाठी ई.जी.एस.योजन लागू करण्यात येईल काय ? जर शेतावर काम करणाऱ्या मजूरांसाठी ही योजना लागू केली तर शेतमजूरांचा फार मोठा प्रश्न सुटू शकतो. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी कृपया याबाबतीत उत्तर द्यावे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे, तो मला समजलेला नाही. त्यामुळे त्यांनी पुन्हा प्रश्न विचारावा.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, मी विचारलेला प्रश्न फार सोपा आहे. याबाबतीत यापूर्वी देखील चर्चा झालेली आहे. रोजगार हमी योजना लागू केल्यामुळे शेतावर काम करण्यासाठी किंवा अन्यत्र काम करण्यासाठी जे मजूर उपलब्ध होत होते, ते आता उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे काही-काही ठिकाणी शेतावर काम करण्यासाठी अजिबात मजूर मिळत नाहीत.शेतावर काम करणारे जे मजूर आहेत, उदाहरण द्यावयाचे तर गहू कापावयाचा असेल किंवा ज्वारी खुडावयाची असेल तर अशा प्रकारे शेतामध्ये काम करणारे जे मजूर आहेत, त्यांच्यासाठी ई.जी.एस.च्या योजनेच्या माध्यमातून काही रक्कम खर्च करणे शक्य असेल तर ती करावी आणि बाकीची रक्कम संबंधित शेतमालकांकडून घेण्यात यावी अशा प्रकारची योजना आखली तर शेतावरील कामे करण्याच्या बाबतीत जी अडचण निर्माण झालेली आहे, ती सोडविता येईल. शासन अशी योजना आखणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मूळ रोजगार हमी योजनेचा जो कायदा आहे, त्यानुसार मागणी प्रमाणे काम उपलब्ध करुन द्यावयाचे आहे. सन्माननीय सदस्यांच्या म्हणण्याप्रमाणे शेतावर काम करणाऱ्या मजुरांना देखील रोजगार हमी योजनेच्या मजुरांप्रमाणे ट्रिट करावे आणि त्याप्रमाणे त्यांना पेमेंट द्यावे, तर ते शक्य होणार नाही.

. . . .एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(3) * 38106 **श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे** : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यात महिला पोलीसांच्या भरतीमध्ये 33 टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, त्यानुसार महिला पोलीसांची भरती करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(4) महिलांना पोलीस भरतीत 33 टक्के आरक्षणाप्रमाणे भरती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) राज्य शासनाच्या धोरणानुसार शासकीय सेवेत महिलांना 30% आरक्षण लागू आहे. हे आरक्षण पोलीस भरतीला लागू आहे. त्याप्रमाणे पोलीस भरती करण्यात येते.

(2) व (3) पोलीस भरतीसाठी पदे घोषित करतांना महिलांची आरक्षित पदे घोषित केली जातात. पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या महिलांची निवड करण्यात येते. पुरेशा पात्र महिला उपलब्ध होत नसल्याने सर्व आरक्षित पदे भरली जात नाहीत.

(4) पोलीस भरतीच्या शारीरिक पात्रतेच्या निकषांमध्ये महिला उमेदवारास पुरूष उमेदवारांपेक्षा उंचीमध्ये 10 से.मी. कमी उंची आवश्यक ठेवली आहे. तसेच शारीरिक चाचणी परीक्षेत पुरूष उमेदवारांना 5 प्रकारच्या तर महिला उमेदवारांना 4 प्रकारच्या चाचण्या ठेवलेल्या आहेत. तसेच निवड समितीमध्ये महिला अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात येतो.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, याठिकाणी पॉईंटेड प्रश्न विचारलेला आहे, परंतु त्या संदर्भात संदिग्ध स्वरुपाचे उत्तर देण्यात आलेले आहे. याठिकाणी असा प्रश्न उपस्थित केलेला आहे की, "महिलांना पोलीस भरतीत 33 टक्के आरक्षणाप्रमाणे भरती करण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे ? " माझा असा प्रश्न आहे की, मागच्या काही वर्षामध्ये पोलिसांची 22 हजार पदे भरण्यात आली आहेत. त्यामध्ये किती महिलांची भरती करण्यात आली आहे ? तसेच यावर्षी पोलिसांची 11 हजार पदे भरण्यात येणार आहेत. त्यामध्ये किती महिलांची पदे भरण्यात येणार आहेत ?

सभापती : सन्माननीय सदस्यांनी एका वेळेला एक किंवा दोन प्रश्न विचारावेत.

श्रीमती उषाताई दराडे : सभापती महोदय, मी दोनच प्रश्न विचारलेले आहेत की, मागच्या वेळेला जी पोलिसांची भरती करण्यात आली, त्यामध्ये किती महिलांची भरती करण्यात आली ? तसेच पुढच्या वेळी पोलिसांची भरती करीत असताना महिला पोलिसांची भरती केली जाईल का ? तसेच पात्र महिला उमेदवार न मिळाल्यामुळे जी पदे रिक्त आहेत, त्याठिकाणी पुन्हा भरती केली जाणार आहे का ?

यानंतर श्री बरवड . . . .

अशुद्धीत प्रत/परिशुद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38106 .....

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, पोलीस भरतीमध्ये महिलांना 33 टक्के आरक्षण नसून 30 टक्के आरक्षण आहे. त्याप्रमाणे आरक्षणाच्या पदसंख्येनुसार जाहिरात केली होती. त्याप्रमाणे मुलाखती झाल्या. परीक्षेला महिला आलेल्या होत्या. परंतु पात्रतेप्रमाणे ज्या महिला पात्र होत्या त्यांच्या नियुक्त्या केलेल्या आहेत. 2005 मध्ये 545 महिलांची भरती केलेली आहे. 2006 मध्ये 1377, 2007 मध्ये 2185 महिलांची पोलीस दलात भरती करण्यात आलेली आहे. महिलांची टक्केवारी पाहिली तर ती दरवर्षी वाढत आहे. 2003 मध्ये 5 टक्के, 2004 मध्ये 16 टक्के, 2005 मध्ये 19 टक्के, 2006 मध्ये 21 टक्के आणि 2007 मध्ये 23.36 टक्के अशी वाढ होत आहे. ज्या पात्र उमेदवार मिळतील त्याप्रमाणे भरती करण्यात येईल.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, या ठिकाणी असे उत्तर दिले आहे की, पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या महिलांची निवड करण्यात येते. पुरेशा पात्र महिला उपलब्ध होत नसल्याने सर्व आरक्षित पदे भरली जात नाहीत. गेल्यावेळी नवी मुंबई येथे पोलिसांची तसेच महिला पोलिसांची भरती होती त्यावेळी मी त्या कॅम्पमधील महिलांना भेटावयास गेले होते. मुली लेखी व तोंडी परीक्षेत पास झाल्या होत्या. मी दोनतीन मुलींना विचारले असता त्यांनी शारीरिक अडचणी सांगितल्या. मुलींसाठी धावण्याची अट आहे. त्यांना पाच सहा वेळा धावावे लागते. मासिक पाळी असेल तर तिसरा किंवा चौथा दिवस असला तरी त्या मुली धावू शकणार नाहीत. त्यामुळे त्यामध्ये त्या नापास होतात. मुलींसाठी जी धावण्याची अट आहे ती शिथिल करण्यात येईल काय ? यामध्ये बऱ्याचशा मुली अपात्र ठरलेल्या आहेत.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, 30 टक्के महिला पोलीस दलामध्ये याव्यात म्हणून यापूर्वीच विभागाने तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ज्या अटी शिथिल करणे शक्य होते त्या शिथिल केलेल्या आहेत. यापेक्षाही अटी शिथिल करण्याचे ठरविले तर कोणताही निकषच लावू नका असे म्हणण्यासारखी परिस्थिती निर्माण होईल. उद्या पोलीस दलाचे काम सक्षमपणे व्हावयास पाहिजे इतक्याच अटी ठेवण्यात आलेल्या आहेत. आताच माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे दिवसेंदिवस मुलींचे पोलीस दलामध्ये भरती होण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. आता हे प्रमाण 23

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38106 ..... श्री. आर. आर. पाटील .....

टक्क्यावर आलेले आहे. गेल्यावर्षी आपल्या राज्यामध्ये महिलांसाठी 2867 जागा राखीव ठेवल्या होत्या त्यापैकी 2185 जागा भरलेल्या आहेत. लवकरच 30 टक्के प्रमाण गाठावयास महिलांना वेळ लागेल असे वाटत नाही. मागील दोन वर्षातील फरक पाहिला तर एका वर्षात 7 टक्क्याने वाढ झालेली आहे. कदाचित पुढच्या भरतीमध्ये 30 टक्के महिला भरल्या जातील. आताच्या नियमाप्रमाणे योग्य पध्दतीने पोलीस भरती झालेली आहे आणि ही पदे भरली जातील असा शासनाला पूर्ण विश्वास आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, या चर्चेच्या माध्यमातून मी लक्ष वेधते की, गेल्या तीन वर्षात हा बॅकलॉग भरला गेलेला नाही. यानंतर हा तीन वर्षाचा बॅकलॉग भरणार काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, बॅकलॉग भरण्याचा प्रयत्न शासनाने केलेला आहे आणि प्रयत्न केला जाईल.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, पुरुष उमेदवारांना 5 प्रकारच्या आणि महिला उमेदवारांना 4 प्रकारच्या चाचण्या ठेवलेल्या आहेत. या 5 आणि 4 चाचण्या कोणत्या हे माननीय मंत्रिमहोदय सांगू शकतील काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, या चाचण्या कोणत्या हे नक्कीच सांगू शकतो. पुरुषांसाठी 100 मीटर धावणे-25 गुण, 800 मीटर धावणे-25 गुण, 10 पूलअप्स-10 गुण, लांब उडी-20 गुण, गोळा फेक-10 गुण या 5 चाचण्या मुलांसाठी ठेवण्यात आलेल्या आहेत. मुलींसाठी 200 मीटर धावणे ही अट आहे. 800 मीटर धावण्याची अट मुलींसाठी यापूर्वीच शिथिल केलेली आहे. फक्त 200 मीटर धावणे ही अट ठेवलेली आहे. 800 मीटर धावण्याऐवजी 3 किलोमीटर चालण्याची अट ठेवलेली आहे. लांब उडी-25 गुण, गोळा फेक-25 गुण या चाचण्या ठेवलेल्या आहेत. पूलअप्सची अट मुलींसाठी शिथिल करण्यात आलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

इंटरनेटवर नायझेरियन पासवर्डचा वापर करुन एच.डी.एफ.सी.बँकेतील ९ भारतीय खातेदारांच्या खात्यावरील २ लाख ४० हजार रुपये हडप करणाऱ्या पाच जणांच्या आंतरराष्ट्रीय टोळीला सांगलीच्या पोलिसांनी अटक केल्याबाबत

(४) * ४११३४ श्री. सुरेश जेथलिया : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंटरनेटवर नायझेरियन पासवर्डचा वापर करुन एच.डी.एफ.सी.बँकेतील ९ भारतीय खातेदारांच्या खात्यावरील २ लाख ४० हजार रुपये हडप करणाऱ्या पाच जणांच्या आंतरराष्ट्रीय टोळीला दिनांक २७ जानेवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास सांगलीच्या पोलिसांनी अटक केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यांचेवर कोणत्या कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे,

(३) असल्यास, त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

श्री.आर.आर.पाटील : (१) सदर प्रकरणी दि.१७/१/२००८ रोजी राज्यातील पांच व्यक्तींना सांगली पोलीसांनी अटक केली आहे.

(२) व (३) सदर आरोपींवर विश्रामबाग पोलीस ठाणे, सांगली येथे गुन्हा र.नं. १२/२००८ भा.दं.वि.सं. कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, ४७४ सह आय.टी. ॲक्ट कलम ६६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पाच व्यक्तींना अटक करण्यात आली. गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील जोगेश्वरी येथील मिल्लत हायस्कूलमधील विद्यार्थ्यांची बेकायदा ने-आण करणाऱ्या एलपीजीवर चालणाऱ्या एका खाजगी मारुती व्हॅनने शॉर्टसर्किटमुळे पेट घेतल्याने विद्यार्थी होरपळून ठार झाल्याबाबत

(५) * ३७२७६ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. शरद रणपिसे , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री.राजन तेली , श्री. रामनाथ मोते , श्री. संजय केळकर , श्री.सय्यद जामा , श्री.कपिल पाटील , श्री. जयंत पाटील , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी येथील मिल्लत हायस्कूलमधील विद्यार्थ्यांची बेकायदा ने-आण करणाऱ्या एलपीजीवर चालणाऱ्या एका खाजगी मारुती व्हॅनने शॉर्टसर्किटमुळे पेट घेतल्याने भरगच्च भरलेल्या मारुती व्हॅनमधील चार विद्यार्थी होरपळून ठार व आठ विद्यार्थी गंभीर जखमी झाल्याची घटना दिनांक २८ जानेवारी, २००८ रोजी घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय व असल्यास, त्यात काय निष्पन्न झाले वा त्याअनुषंगाने दोषींविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच राज्यात विशेषत: प्रत्येक जिल्हा निहाय व मोठमोठ्या शहरांच्या ठिकाणी शाळेतील लहान मुलांना घेवून जाणाऱ्या अशा अनेक खाजगी व्हॅन व रिक्षा असून, त्याकडे परिवहन विभागाचे संबंधित अधिकारी नेहमीच दुर्लक्ष करतात त्यामुळे अनेक अपघात होत असल्याने अशा दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) तसेच मुंबई उपनगर जिल्हा नियोजन मंडळाने शाळांमध्ये अग्निशमन संच बसविण्यासाठी दहा लाख रुपयांची तरतूद करुनही ती खर्च झालेली नाही हे ही खरे आहे काय, असल्यास, अशा घटना घडू नये याकरिता राज्यातील सर्व शाळांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्यासाठी तसेच शाळेतील विद्यार्थ्यांची ने-आण करण्याऱ्या वाहनांचे नियमन करण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) व (२) दिनांक २८.१.२००८ रोजी नादुरुस्त मारुती ओमनी व्हॅन मध्ये ओशिवरा परिसरातील मिल्लत शाळेत जाणाऱ्या लहान मुलांची वाहतूक करीत असणाऱ्या व्हॅन चालकाने व्हॅन चालू करीत असतांना शॉर्ट सर्कीटमुळे व्हॅनला लागलेल्या आगीत होरपळून ३ विद्यार्थी जागीच मृत पावले आहेत. तसेच ८ विद्यार्थी जखमी झाले आहेत. जखमी झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ३ विद्यार्थी रुग्णालयात उपचार सुरु असताना दिनांक १८.२.२००८ रोजी मृत पावले आहेत.

सदर घटनेबाबत ओशिवरा पोलीस ठाणे येथे गु.र.क्र.४५/०८ नुसार भा.दं.वि.सं. कलम ३०४(अ), ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम ६६, १९२(अ) (ब), ५३(१) (ब), ५२, १९१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी व्हॅन चालक यास अटक करण्यात येऊन त्यास न्यायालयीन कोठडी देण्यात आली आहे.

(३) शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित व आरामदायी वाहतूकीबाबत उपाययोजना व दोषी वाहन चालकाविरुद्ध कडक कारवाई करण्याबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाच्या परिपत्रकान्वये सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना निर्देशित करण्यात आले आहेत. सदर परिपत्रकाचे अंमलबजावणीत कुचराई करण्याऱ्या अधिकाऱ्यांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

२....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(४) हे खरे नाही,

दिनांक ३.८.२००५ च्या शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार अग्निशमन यंत्रणा बसविण्याकरीता येणारा खर्च शाळेला देय असणाऱ्या वेतनेतर अनुदानामध्ये ग्राह्य धरण्याबाबत यापुर्वीच सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे बहुतांशी शाळांनी अग्नीशमन सुरक्षेबाबत उपाययोजना केलील आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या वाहनांचे नियमन करण्यासाठी परिवहन आयुक्तांच्या परिपत्रकान्वये सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या आहेत.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर किंवा राज्यातील कोणत्याही शहरी भागामधील शाळेच्या बाहेर जाऊन उभे राहिले तर अनधिकृत वाहने मुलांची ने-आण करीत असल्याचे आपल्याला चित्र दिसते. ज्या गाडीमध्ये ३ ते ५ मुले बसण्याची क्षमता असते त्या जागेत २०-२५ मुलांना बसविले जाते. असे प्रकार सर्रास सुरु आहेत आणि याची शासनाला माहिती आहे. पण शासनाकडून मात्र केवळ परिपत्रके काढली जातात. हा प्रश्न गंभीर आहे. म्हणून शासनातर्फे भरारी पथक नियुक्त करुन काही ठिकाणी छापे घालून त्यांच्यावर कारवाई करण्याचे पाऊल उचलले जाईल काय ? लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, ' शाळेतील विद्यार्थ्यांची ने-आण करणा-या वाहनांचे नियमन करण्यासाठी परिवहन आयुक्तांच्या परिपत्रकान्वये सर्व प्रादेशिक / उप प्रादेशिक परिवहन अधिका-यांना सूचना देण्यात आल्या आहेत ' या परिपत्रकामध्ये कोणत्या सूचना देण्यात आल्या आहेत ? या शाळेमध्ये हा प्रकार घडला तेथे तपासणी झाली होती काय ? याची माननीय मंत्रिमहोदय माहिती देतील काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हा जो अपघात झाला आहे त्याचे प्रमुख कारण असे आहे की, ते वाहन नादुरुस्त होते. मेकॅनिकने हे वाहन चालवू नये, पेट्रोलच्या टाकीतील पेट्रोल लिक होत आहे अशी सूचना केल्यानंतर सुध्दा बाटलीत रॉकेल भरुन त्यातून पाईप लाईन काढून ती इंजिनला जोडण्याचा अतिउत्साहीपणा या वाहन चालकाने दाखविला आणि त्यातून हा अपघात घडला आहे. या वाहन चालकाविरुध्द सदोष मनुष्यवधाचे कलम ३०४-ए लावण्यात आले आहे. या वाहन चालकाला अटक केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी मुलभूत स्वरुपाचा व महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. आपल्या राज्यामध्ये गाडीमध्ये जनावरे किती भरावीत यासाठी नियम आहेत, तसे माणसांसाठी सुध्दा नियम आहेत. पण ते पाळले जात नाहीत, ही वस्तुस्थिती

३....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. त्यामुळे यापुढील काळामध्ये शाळांच्या बाबतीत मुलांची ने-आण करीत असताना सगळया नियमांचे काटेकोरपणे पालन करावे अशाप्रकारचे नोटिफिकेशन परिवहन आयुक्तांनी काढलेले आहे. त्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी अशी भूमिका घेतलेली आहे. याबाबतीत परिवहन विभागाला जेवढे पोलिसांचे मनुष्यबळ लागेल तेवढे मनुष्यबळ पुरविण्यात येईल. सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर मी दवाखान्याला भेट दिली होती. यामध्ये नियमांचे पालन का केले जात नाही याची दुसरी बाजू सुध्दा तपासून पाहिली असता प्रमुख कारण असे आढळून आले की, ही मुले गोरगरीब वस्तीमधील आहेत. जर सगळया नियमांचे पालन करावयाचे म्हटले तर मुलांना शाळेत नेण्याचा व आणण्याचा खर्च वाढत जातो. बसचा वाढीव खर्च देण्याची पालकांची ऐपत नाही. मग ही मुले शाळेतून गळण्याची शक्यता असते, म्हणून एका वाहनातून जास्त मुले गेली तरी चालतील, पण गरीबीला परवडेल अशाप्रकारची भूमिका व्यवहार्य पातळीवर घेतल्या जात आहेत. ही वाहने गरीब मुलांना परवडतील, जी ए.सी.नाहीत, लक्झरीयस नाहीत, गरीबांच्या मुलांना शाळेत नेत आहेत, अशा वाहनांना करातून काही सूट देऊन नियमांचे सक्तीने पालन करुन झोपडपट्टीतील मुलांना, गरीबांच्या मुलांना शाळेपर्यंत नेणे व आणणे सुध्दा परवडेल आणि अशा कामासाठी वाहने सुध्दा उपलब्ध होतील यादृष्टीने परिवहन विभाग, गृह विभाग आणि वित्त विभाग संयुक्तपणे योग्य भूमिका घेईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, उत्तरामध्ये 'अशा वाहनांमध्ये अग्निशमन यंत्रणा बसविण्याकरिता येणारा खर्च शाळेला देय असणा-या वेतनेतर अनुदानामध्ये ग्राहय धरण्याबाबत यापूर्वीच सूचना देण्यात आल्या आहेत ' असे म्हटलेले आहे. माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे. आताच सांगण्यात आले आहे की, या वाहनांना जो खर्च येतो तो शाळेला परवडत नाही. मुलांची ने-आण करण्यासाठी वाहनाला जो खर्च होतो तो खर्च वेतनेतर अनुदानासाठी पात्र धरला जाईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, याबाबतीत शासनाने काहीही विचार केलेला नाही. लोकांना वाहने परवडतील अशाप्रकारे करामध्ये कशाप्रकारे सूट देता येईल याबाबत अभ्यास केला जाईल. या वाहनांना आजच अनुदान देण्याचा प्रश्न सरकारच्या विचाराधीन नाही. परंतु ही वाहने कशी परवडतील याचा शासन जरुर अभ्यास करील.

४....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३७२७६....

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मी आपल्या परवानगीने थोडा अधिक वेळ बोलू इच्छितो. कारण अपघात घडल्यानंतर मी संपूर्ण दिवस तेथे होतो. अतिशय हृदयद्रावक असे चित्र होते. माननीय उपमुख्यमंत्री सुध्दा तेथे आले होते, त्यांनी सुध्दा अतिशय योग्य पध्दतीची कारवाई केली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. तथापि, या लेखी उत्तरातून दोन प्रश्न निर्माण झालेले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

छापील उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "दिनांक 3.8.2005च्या शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णयानुसार अग्निशमन यंत्रणा बसविण्याकरिता येणारा खर्च शाळेला देय असणा-या वेतनेतर अनुदानामध्ये ग्राह्य धरण्याबाबत यापूर्वीच सूचना देण्यात आल्या आहेत." सभापती महोदय, आपल्याला स्मरत असेल की या सभागृहामध्ये मागील वेळेस मी तरणतलावामध्ये मुलाच्या झालेल्या मृत्यूसंबंधीचा मुद्दा उपस्थित केला होता आणि त्याच वेळी विद्यार्थ्यांना ने-आण करणा-या वाहनांचा प्रश्न देखील उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी याबाबतीत सूचना दिलेल्या होत्या. त्यानंतर दुर्दैवाने ही घटना घडली. त्याठिकाणी सुरक्षा यंत्रणा होती म्हणून 5 मुले वाचली. शाळेतील कर्मचा-याने सुरक्षा यंत्रणा वापरली नसती तर ती मुले देखील वाचू शकली नसती. शाळांना वेतनेतर अनुदान मिळत नसल्यामुळे ही यंत्रणा शाळा कशी काय बसविणार असा प्रश्न निर्माण झालेला आहे. या सुरक्षा यंत्रणेसाठी जिल्हा नियोजन मंडळाकडे 10 लाख रुपयाची मागणी केली. परंतु त्यावर 1 रुपया देखील खर्च झालेला नाही. शाळांना वेतनेतर अनुदान मिळत नसल्यामुळे सुरक्षा यंत्रणा बसविण्याचा खर्च कोठून करणार ? ही जी लहान मुले मृत्यूमुखी पडली त्यांच्या कुटुंबियांना 1 लाख रु. मदत देण्यात आली आणि जखमींना फक्त 50 हजार रु. मदत देण्यात आलेली आहे. जी 5 मुले जिवंत राहिली आहेत त्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे. त्यांच्या उपचारावर प्रचंड खर्च होत आहे. या मुलांना शासनाने खाजगी रुग्णालयामध्ये दाखल केलेले आहे.तरी देखील त्यांच्या उपचाराचा खर्च शासन देणार आहे काय ? विद्यार्थ्यांची ने-आण करण्यासाठी जी वाहने वापरली जातात त्यांची दर दोन-तीन महिन्यांनी नियमितपणे तपासणी केली जाणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : ही गोष्ट खरी आहे की, अलिकडच्या काळामध्ये शाळांना वेतनेतर अनुदान बंद केलेले आहे. त्याचा परिणाम म्हणून शाळांना अशा प्रकारची इक्वीपमेंटस् ठेवणे अशक्य झालेले आहे याचाही शासनाने विचार केला आहे. जे वेतनेतर अनुदान दिले जात होते ते देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन आहे. याबाबतीत आम्ही लवकरात लवकर निर्णय घेत आहोत. वेतनेतर अनुदान दिले पाहिजे अशी तत्वत: सगळयांचीच भूमिका आहे आणि तिचा अतिशय

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गांभीर्याने विचार केला जात आहे. अशा प्रकारे मुलांची ने-आण करणा-या वाहनांची पाहणी करण्याचे काम परिवहन विभागाने सुरु केलेले आहे. जखमी झालेला मुलांच्या उपचारावर 50 हजार रु. पेक्षा जास्त खर्च झालेला असून मुख्यमंत्री फंडातूनही मदत दिलेली आहे. त्यांना आणखी मदत देण्याची भूमिका स्वीकारली जाईल.

श्री. संजय दत्त : सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर.आर.पाटील हे फार संवेदनशील आहेत. या समाजिक प्रश्नाला त्यांनी अतिशय गांभीर्याने घेतल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. एक स्पेसिफिक बाब त्यांच्या उत्तरामध्ये आलेली नसल्यामुळे मी त्यांना विनंती करु इच्छितो की, याबाबतीत शासन फार गंभीर आहे हे सिध्द करण्यासाठी भरारी पथकाच्या माध्यमातून अशा वाहनांची तपासणी करण्यात येणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : परिवहन विभागाची भरारी पथके निर्माण केली जातील आणि त्यामध्ये पोलिसांचाही सहभाग असेल. त्या माधमातून अशा वाहनांवर चांगल्या प्रकारे लक्ष ठेवले जाईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बनावट पासपोर्टच्या आधारे परदेशात पाठविणाऱ्या अस्लम पांचाळ याला अटक केल्याबाबत

(६) * ३९८७५ श्री. मधुकर चव्हाण , श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , श्री. शरद रणपिसे , श्री. सुधाकर गणगणे , श्री. सुरेशदादा देशमुख : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बनावट पासपोर्टच्या आधारे परदेशात पाठविणाऱ्या अस्लम पांचाळ याला गुन्हा अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या गंभीर प्रकरणामध्ये भायखाळा पोलीस ठाण्यातील दोन पोलीस शिपाई सहभागी आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने या पोलीस शिपायांवर कोणती कारवाई केली आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) होय, हे खरे आहे

(२) व (३) या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या ११ आरोपींमध्ये भायखळा पोलीस ठाण्यातील दोन पोलीस शिपायांचा समावेश असून सर्व आरोपींविरुध्द गुन्हे प्रकटीकरण शाखा गु.अ.वि.मुंबई गु.र.क्र.११८/०७ कलम ४१९, ४६५, ६४७, ४६८, ४७१, ४७४, २०१, २०२, ३४, भा.दं.वि.सह कलम १२०(ब), भा.दं.वि.सह पारपत्र कायदा कलम १२(१) (अ) (ब) (१-अ) (अ) (ब) (२) (३) सह कलम १४ विदेशी नागरीक कायदा अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून सदर प्रकरणी मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

श्री. संजय दत्त : या गुन्ह्यामध्ये ज्या दोन पोलिसांचा समावेश आहे त्यांना निलंबित करण्यात आलेले आहे काय ? असल्यास, केव्हा पासून ? नसल्यास, निलंबित न करण्याची कारणे काय आहेत ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : या गुन्ह्यामध्ये ज्या दोन पोलिसांचा समावेश आहे त्यांना ज्या दिवशी अटक करण्यात आली त्या दिवसापासून निलंबित केलेले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आंबोली (जि.सिंधुदूर्ग) येथील नांगरतास धबधब्याजवळ भू-सुरुंगाचा स्फोट होऊन दोन व्यक्ती ठार झाल्याबाबत

(७) * ३७७९६ श्री.परशुराम उपरकर , डॉ. निलम गोऱ्हे , डॉ. दिपक सावंत : तारांकित प्रश्न क्रमांक ३४९४४ ला दिनांक २३ नोव्हेंबर, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबोली (जि.सिंधुदूर्ग) येथील नांगरतास धबधब्याजवळ भू-सुरुंगाच्या स्फोटातील दोन मृत व जखमी व्यक्तींना मदत देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : (१), (२) व (३) प्रस्ताव जिल्हाधिकारी कोल्हापूर यांच्या स्तरावर विचाराधिन आहे.

(प्रश्न उपस्थित करण्यात आला नाही.)

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई-नाशिक-धुळे या चौपदरी रस्त्यांचे कसारा घाटातील
काम नियोजन कालावधीपेक्षा मंदगतीने सुरु असल्याबाबत

(८) * ३८४७४ श्री.अरुण गुजराथी , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३२३२९ ला दिनांक २६ जुलै, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-नाशिक-धुळे या चौपदरी रस्त्यांचे कसारा घाटातील काम नियोजन कालावधीपेक्षा मंदगतीने सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घाटातील काम सत्वर पूर्ण करणेसंदर्भात शासन काय कारवाई करीत आहे वा करणार आहे ?

श्री.छगन भुजबळ : (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, "मुंबई-नाशिक-धुळे" या चौपदरी रस्त्याच्या कामास विलंब होत आहे असा प्रश्न विचारला असता सदर रस्त्यांच्या कामास विलंब झालेला नाही अशा प्रकारचे लेखी उत्तर शासनाकडून देण्यात आले आहे. सदर काम एकूण किती रुपयांचे आहे ? या कामावर आतापर्यंत किती खर्च करण्यात आलेला आहे ? भौतिकदृष्टया सदर काम किती टक्के पूर्ण झाले आहे ? सदर रस्त्यांचे एकूण काम किती असून ते किती कालावधीपर्यंत पूर्ण होईल ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मुंबई-नाशिक-धुळे आणि पुढे राज्य सीमा या संपूर्ण रस्त्याचे चौपदारीकरणाचे काम भारत सरकारच्या माध्यमातून सुरु आहे. सदरहू काम चार भागामध्ये विभागण्यात आले आहे. मुंबई-भिवंडी येथील वडपे ते गोंदे हा सदर रस्त्याचा कामाचा पहिला भाग आहे. गोंदे-नाशिक-पिंपळगाव हा दुसरा कामाचा भाग आहे. पिंपळगाव ते धुळे हा तिसरा भाग आहे आणि धुळे ते राज्य सीमा असा चौथा भाग आहे. यापैकी दोन भागांचे प्रत्यक्षात काम सुरु झाले आहे. भाग क्रमांक एक वडपे ते गोंदे या रस्त्याच्या कामास प्रत्यक्षात सुरुवात झाली आहे आणि या रस्त्याच्या भागात घाटातील कामाचा समावेश असून त्या अनुषंगाने प्रश्न

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विचारला गेला आहे. मी पुन्हा सांगू इच्छितो की, भाग क्रमांक वडपे ते गोंदे तसेच भाग क्रमांक दोन पिंपळगाव ते धुळे या रस्त्यांचे काम प्रत्यक्षात सुरु झालेले आहे. सदरहू रस्त्याच्या कामाची किंमत 556 कोटी रुपये आहे. सदरहू काम मेसर्स मुंबई-नाशिक एक्सप्रेस वे मुंबई लिमिटेड या कंपनीस काम दिले असून सदर रस्त्याच्या कामाचा कार्यारंभ आदेश दिनांक 12 एप्रिल, 2006 रोजी देण्यात आलेला आहे. सदर काम करण्याची मुदत तीन वर्षाची आहे. याचा अर्थ हे काम एप्रिल 2009 पर्यंत पूर्ण होईल, अशी अपेक्षा आहे. सद्य:स्थितीत हे काम 55 टक्के पूर्ण झाले आहे. या कामाची किंमत 556 कोटी रुपये एवढी आहे. या रस्त्याच्या कामास काही अडचणी येत होत्या, वन विभागाच्या अडचणी होत्या, जमीन संपादनाच्या अडचणी होत्या, त्याचप्रमाणे तेथील क्रशर संबंधी अडचणी होत्या, त्या सगळया अडचणी सोडविण्यामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागास यश मिळालेले आहे. सदर रस्त्याचे काम करण्यात थोडासा निश्चितपणे विलंब झालेला आहे ही गोष्ट मला मान्य आहे. सदर कामास विलंब झाला असला तरी तो वेळ पिकअप करण्यात आला आहे. मला निश्चितपणे अपेक्षा आहे की, वेळेमध्ये सदर रस्त्याचे काम संपेल. एप्रिल, 2009 पर्यंत वडपे ते गोंदे या भागातील रस्त्याचे काम पूर्ण होऊन तो वाहतुकीसाठी निश्चितपणे कार्यान्वित होईल. अशी या रस्त्याच्या कामाची परिस्थिती आहे. म्हणून या कामाला विलंब झालेला नाही, अशा प्रकारचे लेखी उत्तर विभागाकडून देण्यात आले आहे

श्री. चंद्रकांत रघुवंशी : मुंबई-नाशिक-धुळे या मार्गावरील धुळे ते नाशिक या मार्गावरील चौपदारीकरणाचे कामास गती प्राप्त झाली आहे. नाशिक ते मुंबई या मार्गावरील चौपदरीकरणाचे काम थोडेसे रखडलेले आहे. हा संपूर्ण प्रोजेक्ट कधीपर्यंत पूर्ण होईल ? धुळे ते महाराष्ट्र राज्याच्या हद्दीपर्यंतच्या म्हणजे एम.पी.बॉर्डरपर्यंतच्या रस्त्याच्या कामास शासनाने मंजुरी दिली आहे काय ? शासनाने या कामास मंजुरी दिली असल्यास सदर कामास केंव्हा सुरुवात होईल ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, सदर रस्त्याच्या दोन भागाचे काम सुरु झाले आहे. यामध्ये तिसरा भाग पिंपळगाव ते धुळ या रस्त्याचा असून त्या रस्त्याचे काम इरकॉन सोमा टोल वे कंपनीला देण्यात आले असून दिनांक 28 मार्च, 2006 रोजी वर्क ऑर्डर देण्यात आली आहे.

यानंतर श्री कानडे...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38474 पुढे सुरु .....

श्री. छगन भुजबळ ....

सभापती महोदय, येत्या तीन वर्षामध्ये हे काम पूर्ण व्हावयाला पाहिजे. ज्यावेळी मी या कामाची माहिती घेतली त्यावेळी या रस्त्याचे काम वेगाने सुरु आहे असे दिसून आले आणि जवळजवळ 70 टक्के काम पूर्ण झालेले आहे. निश्चितपणाने अशी अपेक्षा आहे की, या रस्त्याचे काम दिलेल्या मुदतीमध्ये पूर्ण होईल. सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी आणखी दोन प्रश्न विचारलेले आहेत. एक म्हणजे गोंदे-नाशिक-पिंपळगांव हा रस्ता आणि धुळे ते राज्यमार्ग हा दुसरा रस्ता कधी पूर्ण होणार ? सभापती महोदय, गोंदे-नाशिक-पिंपळगांव या रस्त्याचे काम जवळजवळ 752 कोटी रुपयांचे आहे. त्यामध्ये भारत सरकारची 40 टक्के ग्रॅन्ट आहे प्रस्तावित केलेली आहे. प्री क्वॉलिफिकेशन टेंडर्स जानेवारी 2008 मध्ये प्राप्त झालेल्या आहेत. साधारणपणे एप्रिल-मे पर्यंत फायनान्शिअल टेंडर्स मागवून कमीत कमी ग्रॅन्टची जी कंपनी अपेक्षा करील तसेच कामाची मर्यादा आणि कंपनीची शक्ती पाहून त्यासंदर्भात निश्चितपणाने निर्णय घेतला जाईल. हे काम 3 वर्षामध्ये पूर्ण करावे अशी अपेक्षा आहे. या कामामध्ये नाशिक शहरामधून पुढे जाणारा या देशातील सर्वात मोठा उड्डाणपूल प्रस्तावित केलेला आहे. त्यानंतर धुळे-मध्यप्रदेश हा महाराष्ट्राच्या सीमेपर्यंतच्या रस्त्याचा जो प्रश्न आहे त्याबाबतीत सुध्दा मी सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे मुंबई-नाशिक-धुळे या रस्त्याच्या कामाबरोबरच हे काम घेतलेले आहे. त्यासाठी सुध्दा प्रिक्वॉलिफिकेशन टेंडर्स निघालेली आहेत. त्याची किंमत 675 कोटी रुपये आहे. यामध्ये सुध्दा केंद्र शासनाने 40 टक्के ग्रॅन्ट प्रस्तावित केलेली आहे. हे काम पूर्ण करण्याची क्षमता, आणि यंत्रसामुग्री याबाबतचे रेकॉर्ड पाहून कोणत्या कंपनीला हे काम द्यावयाचे याबाबतचा निर्णय घेतला जाईल. तसेच हे काम पुढील 3 वर्षात पूर्ण व्हावे अशी अपेक्षा आहे.

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, नाशिक शहरातून ज्याप्रमाणे उड्डाणपूल मंजूर करण्यात आला आहे त्याचप्रमाणे धुळे शहरातून सुध्दा बायपास रोड जात असल्यामुळे तेथे उड्डाणपूल करावा अशी स्थानिक रहिवासी आणि लोकप्रतिनिधींची मागणी आहे. यासाठी धुळे शहरातील मूळ चौक तसेच जळगांव-चौपुरी या दोन ठिकाणी उड्डाणपूल मंजूर करण्यात येईल काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 38474.....

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या उड्डाणपुलांचा याठिकाणी उल्लेख केला त्यासंबंधीची सविस्तर माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नाही. केंद्र शासनाचा प्रस्ताव आहे. धुळे येथील लोकप्रतिनिधींनी ही गोष्ट माझ्या निदर्शनास आणून दिली होती. त्याच्यामध्ये बायपास करावा यासंदर्भातील माहिती माझ्याकडे नाही. सीसआरएफ मधून पैसा उपलब्ध करुन काम करण्याचा शासन प्रयत्न करणार आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली जी बाब आहे त्याचा माझ्या उत्तरामध्ये समावेश नसला तरी यासंदर्भात काय करावयाला पाहिजे त्याचा अभ्यास करुन निश्चितपणाने कार्यवाही करण्यात येईल.

नंतर श्री.भोगले

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जे.डब्ल्यू मेरियट या जुहू मधील पंचतारांकित हॉटेल मधून बाहेर पडत असलेल्या दोन युवतींवर जमावाने सामुहिक विनयभंग केल्याबाबत

(९) * ३७४१० श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री.सय्यद पाशा पटेल , श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , डॉ. वसंत पवार , श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. गोविंदराव आदिक , श्री. शरद रणपिसे , श्री. मधुकर सरपोतदार , डॉ. दिपक सावंत , श्री. दिवाकर रावते , श्री. अनिल परब , श्री.परशुराम उपरकर , श्री.अरुण गुजराथी : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ जानेवारी, २००८ रोजी वा त्यासुमारास पहाटे जे.डब्ल्यू मेरियट या जुहू (मुंबई) येथील पंचतारांकित हॉटेल मधून बाहेर पडत असलेल्या दोन युवतींना जमावाने घेरुन त्यांचा सामुहिक विनयभंग करण्याचा प्रयत्न केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय, या प्रकरणी किती संशयीतांना अटक करण्यात आली असून, पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) सदर युवतीनी जुहू पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली आहे काय, असल्यास, उक्त तक्रारीत नेमके काय नमूद केले आहे, सदर युवतींची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे काय, असल्यास, त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे काय, त्यामध्ये काय नमूद करण्यात आले आहे,

(४) सदर युवतीची वैद्यकीय तपासणी करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) होय.

(२) दिनांक २.१.२००८ रोजी एका पत्रकाराने दिलेल्या तक्रारीवरुन गु.र.क्र.५/२००८ कलम १४३, १४७, १४९, ३२३, ३५४, ३४१, ५०४, ५०६ भादवि सह मु.पो. कायदा अंतर्गत गुन्हा नोदविण्यात येऊन १४ संशयीतांना दिनांक ४.१.२००८ रोजी अटक करुन त्यांची ओळख परेड घेण्यात आली. त्यांना साक्षीदारांनी ओळखले आहे. आरोपींविरुध्द फौ.दं.प्र.सं. च्या कलम ११०(ग) अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे. इतर आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

(३) व (४) नाही, घडलेल्या घटनेबाबत सदर दोन्ही मुली व त्यांचेसोबतच्या दोन इसमांकडे चौकशी केली असता त्यांनी कोणतीही घटना घडली नसल्याचे व त्यांची काही तक्रार नसल्याचे सांगितले. त्यांना कोणीही त्रास दिला नसून कोणीही गैरवर्तन केले नसल्याचे सागितले. तसेच त्यांनी वैद्यकिय उपचार व मदत नाकारली व त्या ०३.०० वा च्या विमानाने जायचे असल्याचे सांगून निघून गेल्या सबब त्यांची वैद्यकिय तपासणी करण्यात आली नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, राज्यातील प्रत्येक नागरिकाची मान शरमेने खाली जाईल अशी ही दुर्दैवी घटना नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी घडली. मागील वर्षी सुध्दा 31 ऑक्टोबर रोजी गेटवे ऑफ इंडिया येथे अशाच प्रकारची घटना घडली होती. काही पत्रकार मित्रांनी ती घटना उघडकीस आणली होती. या घटनांची नोंद गंभीरपणे घेऊन अशा घटनांची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुनरावृत्ती होऊ नये म्हणून शासनाने कोणती पावले उचलली आहेत? उत्तरामध्ये म्हटले आहे की, आरोपींचा शोध घेण्यात येत आहे. हा शोध पूर्ण होण्यासाठी किती कालावधी लागणार आहे?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, 31 डिसेंबर, 2007 व नववर्षाच्या पहाटे ही घटना घडली होती. त्याठिकाणी गस्त घालणारे ट्रफिक पोलीस घटनास्थळी गेले, त्यांनी संबंधित दोन्ही मुलींना जुहू पोलीस स्टेशनवर आणले व त्यांची काही तक्रार असेल तर नोंदवून घ्यावी आणि त्यानुसार कारवाई करावी असे सांगितले. परंतु त्या दोन्ही मुलींनी सांगितले की, आमची कोणाही विरुध्द तक्रार नाही. आमच्याविरुध्द कोणी गैरवर्तन केलेले नाही त्यामुळे आम्ही तक्रार करणार नाही. तेव्हा पोलीस स्टेशनकडून त्यांचा मोबाईल नंबर नोंदवून घेण्यात आला व पहाटे 3.00 वाजता त्यांना विमानतळावर सोडण्यात आले. घटनास्थळी हिंदुस्थान टाईम्सचे पत्रकार उपस्थित होते. त्यांनी तक्रार दिली की, मी घडलेल्या घटनेचे फोटो काढले असून त्यामध्ये ज्या व्यक्ती समाविष्ट आहेत त्यांच्याविरुध्द तक्रार नोंदवून घ्यावी. त्यानुसार 14 संशयितांना ताब्यात घेण्यात आले व इतर आरोपींचा तपास सुरु आहे. अशा घटना वारंवार घडतात. त्यांची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून सर्वांनीच सामाजिक नैतिकता पाळली पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी कसे वागावे हे प्रत्येकाने ठरविले पाहिजे. पोलीस ठिकठिकाणी गस्त घालीत असून अशा घटना घडू नयेत म्हणून काळजी घेत आहेत.

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, इतर आरोपींचा शोध घेण्यात येत आहे असे म्हटले आहे. परंतु यासंबंधी निश्चित कालमर्यादा ठरविली पाहिजे. अशा घटना घडणे हे राज्याच्या दृष्टीने भूषणावह नाही. या संदर्भात कोणावर जबाबदारी निश्चित केली आहे?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : जुहू पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.धीरज कोळी, श्री.वैभव पाटील हे तपास करीत असून त्यांच्याकडे जबाबदारी सोपविली आहे. त्यांनी फोटोमध्ये दिसून आलेल्या 14 लोकांना अटक केली असून उर्वरित तपास सुरु आहे.

अशुद्धीरहित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बुलढाणा व अकोला जिल्हा हद्दीवर असलेल्या प्रसिद्ध वीर हनुमान मंदिरावरील दरोडा

(१०) * ४००६४ श्री. सुधाकर गणगणे , श्री. संजय दत्त , श्री.सय्यद जामा , श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा व अकोला जिल्हा हद्दीवर असलेल्या प्रसिद्ध वीर हनुमान मंदिरावर दिनांक २१ डिसेंबर, २००७ रोजी वा त्यादरम्यान दरोडेखोरांनी दरोडा घालून रोकड व देवांचे दागिन्याची चोरी केल्याचे उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दरोडेखोरांचा शोध घेऊन त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) दिनांक २२ डिसेंबर, २००७ रोजी बुलढाणा जिल्ह्यातील तामगांव पोलीस स्टेशनच्या हद्दीत असलेल्या प्रसिध्द वीर हनुमान मंदीरावर सात ते आठ इसमांनी दरोडा घालून रोकड व देवाच्या दागिन्याची चोरी केली, हे खरे आहे.

(२) होय.

(३) व (४) सदर घटनेबाबत तामगांव पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. १५१/०७ भा.दं.वि कलम ३९५ व ३९७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत आरोपीच्या वर्णनाबाबत माहिती घेऊन वेगवेगळे पोलीस पथक तयार करून आरोपीचा शोध घेण्यात येत आहे. तसेच फिंगरप्रिंट तज्ञ तसेच श्वान पथकाची देखील मदत धेण्यात आली असून, गुन्हेगारांचा शोध घेण्यात येत आहे. या प्रकरणी तीन संशयीतांना अटक करण्यात आलेली असून तपास सुरू आहे.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, अकोला किंवा बुलढाणा नव्हे तर संपूर्ण विदर्भ आणि मध्यप्रदेश राज्यात प्रसिध्द असणारे हे हनुमान मंदिर आहे. ज्या तीन संशयितांना अटक केली आहे ते महाराष्ट्र राज्यातील नागरिक आहेत की परराज्यातील नागरिक आहेत?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, दरोडा पडल्यानंतर मंदिराच्या पुजाऱ्यांनी संशयित म्हणून आरोपींचे वर्णन केले होते. ते वर्णन इतर गुन्हयांमध्ये सापडलेले मध्यप्रदेशातील जे गुन्हेगार होते त्यांच्याशी मिळतेजुळते असल्यामुळे संबंधित तीन संशयितांना अटक करण्यात आली. एकूण 10 आरोपी होते, त्यांची ओळखपरेड घेण्यात आली होती. परंतु ज्यांना मारहाण झाली होती ते लोक या आरोपींना ओळखू शकले नाहीत. कारण दरोडेखोरांनी तोंडावर रुमाल बांधले होते. हे सर्व दरोडेखोर बाहेरच्या प्रांतातील होते.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हल्लीच्या काळामध्ये देवदेवताही सुरक्षित राहिलेले नाहीत. मध्यंतरी देहू येथील तुकाराम महाराजांचा मुकुट चोरीला गेल्याची घटना घडली होती.

(नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त..... ता. प्र. क्र. 40064.....

माझा प्रश्न असा आहे की, आज राज्यामध्ये ठिकठिकाणी अशा घटना घडत आहेत. म्हणून देव-देवतांचा मंदिरांना दरोडेखोरांपासून संरक्षण देण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : महोदय, देव-देवतांना चोरांपासून भीती आहे तेथे आपण संरक्षणाची व्यवस्था केली आहे तसेच त्यांचे संरक्षण करण्याची बुध्दी देव आम्हाला देवो अशी मी प्रार्थना करतो.

श्री. सुधाकर गणगणे : महोदय, अचलपूर (मध्य प्रदेश) येथे दरोडा पडला होता तेथील आरोपींना ओळख परेडसाठी आणले होते, परंतु त्यांनी सांगितले की, आम्ही या आरोपीना ओळखत नाही. या आरोपींना मध्य प्रदेश पोलिसांनी कोर्टाकडून ताब्यात घेतले असून त्यांना अद्याप जामीन मिळालेला नाही.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना.

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "राज्यात नुकताच कोंकण, मराठवाड्यासह इतर भागात सलग तीन दिवस जोरदार अकाली पाऊस पडणे, या पावसामुळे आंबा, बेदाणा, कांदा व इतर बागायती पिकांचे नुकसान झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंता निर्माण होणे, या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण करुन त्वरित नुकसान भरपाई देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने , मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री श्रीकांत जोशी, पाशा पटेल, यांनी "उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील मजुरांना गेल्या दोन वर्षांपासून कुंपण असूनही गहू-तांदूळ मिळत नसणे, तहसीलदाराने 2100 क्विंटल गहू गोडाऊनमधून गायब झाल्याची कबूली देणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने , मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, जगदीश गुप्ता, केशवराव मानकर, पाशा पटेल, यांनी "नागपुरातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय या संस्थेस "एम्स" च्या धर्तीवर केंद्रशासन मंजुरी देण्यास तयार असूनही राज्य शासनाने संबधित प्रस्ताव केंद्रशासनाकडे न पाठविणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने , मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता, यांनी "गवंढाळा, ता. खामगांव, जि. बुलढाणा येथील महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात गेल्या 5-6 वर्षांपासून अनेक गैरप्रकार सुरु असून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेच्या पैशाचे वाटप अद्यापपर्यंत मुलींना न करणे, प्रशिक्षित प्राध्यापकांची नियुक्ती न करणे, भारत सरकारच्या शिष्यवृत्तीच्या पैशाचे वाटप न करता विद्यार्थ्यांच्या खोटया सह्या करुन लाखो रुपयांचा अपहार करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने , मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, जगदीश गुप्ता यांनी "हिंगोली जिल्ह्यातील औंढा-नागनाथ या तालुक्यातील 50 ते 60 टक्के भाग डोंगराळ असून पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यासाठी राज्य शासनाने अनेक योजना जाहीर करणे, सुमारे 2 वर्षापूर्वी बांधलेल्या बंधाऱ्यात अद्यापपर्यंत पाण्याची साठवण न होणे, बंधाऱ्याच्या कामात सिमेंट काँक्रीटऐवजी दगड-माती भरण्यात येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने , मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी " रॅबिज या एक्सपायरी डेट जवळ आलेल्या औषधाची सुमारे 30 कोटी रुपयांची खरेदी करण्यात येणे, या औषधाचा 15 ते 20 हजारांचा पुरेसा साठा असूनही सदर खरेदी केलेला साठा ग्रामीण रुग्णालयात वापरण्यात येणे, मुंबईतील रॅनबॅक्सी लॅबोरेटरीत या रॅबिजची खरेदी करण्यात येणे, मुदत संपत आलेल्या रॅबिजची अनावश्यक खरेदी करुन शासनाचे झालेले कोटयवधी रुपयांचे नुकसान" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने , मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

अन्य ज्या सूचना होत्या त्यांना मी दालनातच अनुमती नाकारली आहे.

.....4

अशुधारित प्रत/शोधनीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचनेच्या निवेदनाबाबत
अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "बीड शहरात अल्पवयीन मुलीवर झालेला बलात्कार" या विषयासंबंधी सर्वश्री नितीन गडकरी व इतर वि.प.स. यांनी दिलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेवर दिनांक 28 मार्च, 2006 रोजी चर्चेच्या वेळी सभागृहात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवत आहे.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

अधिक माहिती

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सिध्दाराम म्हेत्रे (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने "जालना शहरात अल्पवयीन मुलीचे अपहरण करुन तिच्यावर करण्यात आलेले पाशवी अत्याचार" या विषयासंबंधी श्रीमती नीलम गोऱ्हे व इतर इतर वि.प.स. यांनी दिलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचनेवर दिनांक 4 एप्रिल, 2006 रोजी चर्चेच्या वेळी सभागृहात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे माननीय सभापतींनी निदेश दिल्याप्रमाणे अधिक माहिती सभागृहासमोर ठेवत आहे.

सभापती : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

अधिक माहिती

(प्रेस : कृपया येथे सोबत जोडलेली अधिक माहिती छापावी.)

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, नियम 93 ची निवेदने आज घेतली जाणार नाहीत.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, दुस-या दिवसाचे, तिस-या दिवसाची निवेदने सुध्दा अद्यापपावेतो झालेली नाहीत.

सभापती : सदर निवेदने उद्या होण्याची व्यवस्था करण्यात येईल. आता लक्षवेधी सूचना क्रमांक एक चर्चेला घेण्यात येईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: आष्टा, ता. वांळवा, जि.सांगली येथील वादोली धरणग्रस्तांना दिलेली जागा अद्यापही त्यांच्या नावे न करणे

मु.शी.: आष्टा, ता. वांळवा, जि.सांगली येथील वादोली धरणग्रस्तांना दिलेली जागा अद्यापही त्यांच्या नावे न करणे यासंबंधी सर्वश्री विलासराव शिंदे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्यस अनुपस्थित)

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक -2 संबंधी</u>

सभापती : आता लक्षवेधी सूचना क्रमांक दोन चर्चेला घेण्यात येईल.

श्री.व्ह.यू.डायगव्हाणे : सन्माननीय सभापती महोदय, लक्षवेधी सूचना क्रमांक तीन नंतर लक्षवेधी सूचना क्रमांक दोन घेतली तर योग्य राहील अशी माझी आपणास नम्र सूचना आहे.

सभापती :ठीक आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक तीन चर्चेला घेण्यात येईल.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्हयातील 64 सहकारी उपसा जलसिंचन योजना अद्यापपर्यंत शेतक-यांना हस्तांतरीत न करणे

मु. शी. : धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्हयातील 64 सहकारी उपसा जलसिंचन योजना अद्यापपर्यंत शेतक-यांना हस्तांतरीत न करणे यासंबंधी सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, संजय दत्त, मुझफ्फर हुसेन सय्यद, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"धुळे, नंदूरबार व जळगांव जिल्ह्यातील ६४ सहकारी उपसा जलसिंचन योजना तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाकडे वर्ग करण्याचा शासनाने निर्णय घेऊन अनेक वर्ष होऊनही अद्यापपर्यंत सदर उपसा जलसिंचन योजना शेतकऱ्यांना हस्तांतरीत केल्या नसल्यामुळे सदर योजना शेतकऱ्यांना हस्तांतरीत करण्यासाठी उक्त जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार मागणी करुनही याबाबत अद्यापही कार्यवाही न झाल्यामुळे शेतकऱ्यांवर कर्जबाजारी होण्याची आलेली पाळी, परिणामी तेथील जनतेमध्ये पसरलेला असंतोष, याप्रकरणी शासनाने घेतलेल्या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ. सुनील देशमुख (पाटबंधारे राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, सदर लक्षवेधी सूचना वाचल्यानंतर आपल्या लक्षात येईल की, जळगाव, धुळे व नंदुरबार अशा तीन जिल्हयाच्या संदर्भातील सदर लक्षवेधी सूचना असतांना राज्य सरकारने हा प्रश्न लवकर सुटू नये या हेतुने संपूर्ण राज्याचे उत्तर या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने दिलेले आहे. त्यामुळे यासंदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, धुळे, नंदूरबार व जळगाव जिल्हयातील 64 सहकारी उपसा जलसिंचन योजना तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाकडे वर्ग करण्याचा शासनाने निर्णय अनेक वर्षापूर्वी घेतलेला आहे. या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री तसेच जलसंपदा मंत्र्यांनी सुध्दा यासंदर्भात बैठक घेऊन तीन महिन्याच्या आत या 64 योजना तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाकडे वर्ग करण्यात येतील असा निर्णय घेतला होता. या गोष्टीला आता दीड वर्ष उलटून गेलेले आहे त्यामुळे या तीन जिल्हयातील सर्व योजना हे अधिवेशन संपण्याच्या आत तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाकडे वर्ग करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे विचार मांडलेले आहेत ती वस्तुस्थिती आहे. परंतु उपसा जलसिंचन योजनेच्या संदर्भात इतर विभागातील सन्माननीय सदस्यांकडून उपसा सिंचन सहकारी योजनेच्या संदर्भात आग्रह राहिला होता त्यामुळे यासंदर्भात माननीय मुख्यमंत्रीमहोदयांनी महाराष्ट्रात अशा किती योजना आहेत व या सर्व योजना सरकारने आपल्या ताब्यात घेतल्या व त्या सुरु करण्यास व त्यांची दुरुस्ती करावयाची झाली तर शासनावर किती भार पडेल यासंदर्भातील माहिती गोळा करण्यास इतर विभागांना निर्देश दिले होते. तेव्हा असे लक्षात आले होते की, राज्यात अशा प्रकारच्या 938 योजना असून ज्या योजना बंद पडलेल्या आहेत त्या सुरु करण्यासाठी शासनावर 1084 कोटी रुपये भार पडणार होता. त्यामुळे या सर्व योजना आता विचारार्थ असून अद्याप या योजनांच्या निर्णय होणे बाकी आहे.

श्री. अरुण गुजराथी : माननीय सभापती महोदय, धुळे, नंदूरबार आणि जळगाव जिल्हयातील उपसा जलसिंचन योजना तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाकडे वर्ग करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता व यासंदर्भात कॅबिनेटच्या मिटिंगमध्ये सुध्दा निर्णय झाला होता त्यामुळे झालेला निर्णय तसाच ठेवण्यात यावा व त्यानंतर महाराष्ट्रातील संपूर्ण सहकारी उपसा

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी.....

जलसिंचनांच्या संदर्भात निर्णय घेण्यात यावा. उपसा जलसिंचनाच्या संदर्भात जो निर्णय घेतला होता त्याला अगोदरच विलंब झालेला आहे. धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्हयातील 64 सहकारी उपसा जलसिंचन योजना तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळाकडे वर्ग करण्यात येतील असे त्या त्या भागात येऊन माननीय मंत्रीमहोदयांनी शब्दही दिला होता. त्यामुळे जळगाव, धुळे व नंदुरबार या जिल्हयांच्या संदर्भात संपूर्ण महाराष्ट्राचा विचार न करता अगोदर घेतलेल्या निर्णयाप्रमाणे या तीनही जिल्हयातील 64 सहकारी उपसा जलसिंचन योजना तापी ख्रोरे पाटबंधारे विकास मंहामंडळाकडे वर्ग करण्यात याव्यात व यासंदर्भातील निर्णय शासन हे अधिवेशन संपण्याच्या आत करेल काय?

यानंतर श्री. गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी या पूर्वीच सांगितले आहे की, या बाबतीत मंत्रीमंडळाचा निर्णय झाला होता व त्यानंतर इतर विभागातील लोकप्रतिनिधींकडून देखील सातत्याने आग्रह करण्यात आला होता. शासनाने एका विभागासाठी जर निर्णय घेतला तर दुसऱ्या विभागासाठी देखील त्या निर्णयाची अंमलबजावणी करणे हे अनिवार्य आहे. तीन जिल्हयासाठी निर्णय घ्यावयाचा असेल तर कालांतराने संपूर्ण महाराष्ट्रासाठी देखील निर्णय करणे अनिवार्य आहे. त्या निर्णयामुळे जो काही आर्थिक भार शासनावर पडणार आहे तो शासनाला परवडणारा आहे काय याचा विचार करणे आवश्यक आहे. एक हजार कोटी रुपयांचा भार शासनावर पडणार असल्यामुळे पूर्ण् विचार केल्यानंतर अंतिम निर्णय घेणे आवश्यक आहे आणि त्याचा सध्या विचार सुरु आहे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, आपल्या मार्फत मला माननीय मंत्री महोदयांना साधा प्रश्न विचारावयाचा आहे. या भागातील उपसा जल सिंचन योजना पूर्ण झाल्या असून या संपूर्णपणे जुन्या झालेल्या आहेत. त्या योजना पूर्ण झाल्यानंतर काही दिवस चालल्या होत्या आणि त्यानंतर बंद पडल्या होत्या. या योजनांचा एकरी खर्च सुध्दा अत्यल्प आहे. तापी खो-यातील बॅरेजेस पूर्ण केलेल्या असल्यामुळे तेथे पाणी अडविले जाते परंतु ते शेतक-यांच्या शेतापर्यंत पोहोचत नाही. शेतकऱ्याच्या शेतीला पाणी मिळावे म्हणून 500 ते 1000 कोटी रुपयांच्या उपसा जल सिंचन योजना तयार केल्या जातात. या तीन जिल्हयातील उपसा जल सिंचन योजना 200 कोटी रुपयांच्या असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्केने त्या साठी कर्ज रोखे घेण्याचा निर्णय घेतला होता . त्यामुळे या कामासाठी शासनाला पैसे द्यावे लागणार नाहीत तर धुळे, नंदूरबार, जळगाव या तीन जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्का कर्ज रोखे घेण्यास तयार आहेत. शेतक-यांनी आत्महत्या केल्यामुळे त्यांच्यावरील कर्ज माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता तेव्हा आमच्या भागातील उपसा जल सिंचनाच्या योजना ताब्यात घेण्यासाठी आमदारांनी आत्महत्या कराव्यात असे शासनाला वाटते काय ?आमदारांनी आत्महत्या केलयानंतर शासन या उपसा जल सिंचन योजना ताब्यात घेणार आहेत काय ?. या उपसा जल सिंचन योजना ताब्यात घेण्यासाठी शासनाने निर्णय घेतला होता, कॅबिनेटने निर्णय घेतला होता, माननीय मुख्यमंत्र्यांनी निर्णय घेतला होता त्याचबरोबर जल संपदा मत्र्यांनी देखील निर्णय घेतला होता. त्याच बरोबर आपणसुध्दा वेळोवेळी आमच्या खानदेश मध्ये येऊन त्या संदर्भात घोषणा केली होती. तेव्हा शासनाने जो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्णय घेतला होता त्या निर्णयाची अंमजबजावणी आपण करावी याची आठवण आपल्याला करुन द्यावी लागत असेल तर ते आमचे दुर्देव आहे. ज्या तीन जिल्हयातील उपसा जल सिंचन योजना ताब्यात घेण्याच्या बाबतीत कॅबिनेटने निर्णय घेतला आहे त्या निर्णया प्रमाणे या तीन जिल्हयातील उपसा जल सिंचन योजना हे अधिवेशन संपण्याच्या आत शासन ताब्यात घेणार आहे काय ?. शासनाने या उपसा जल सिंचनाच्या योजना ताब्यात घेतल्या तरच त्या भागातील बॅरेजेसचे पाणी शेतक-याच्या शेतीला पाणी मिळणार आहे अन्यथा या बॅरेजेसचे पाणी फक्त तापी नदीच्या पात्रात अडविले असल्याचे अजून दोन तीन वर्षे आपल्याला दिसून येईल. नदी पात्रात हे पाणी अडविण्यासाठी आम्ही बॅरेजेस बांधलेली नाहीत. तेव्हा शासन हा निर्णय तात्काळ घेणार आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आताच सांगितले आहे की, तीन जिल्हयासाठी हा निर्णय घेतला तर भविष्यात त्याचा पूर्ण महाराष्ट्रासाठी विचार करावा लागेल. तीन जिल्हयासाठी निर्णय घेतला तर इतर जिल्हयातील लोकप्रतिनिधीकडून देखील त्याबाबतीत सातत्याने मागणी करण्यात आली आहे. त्यामुळे त्या भागाचा विचार करावा लागणार आहे. ज्या भागातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत त्या विभागातील लोकप्रतिनिधींनीसुध्दा मागणी केली होती त्यामुळे तीन जिल्हयापुरता निर्णय घेतला तरी संपूर्ण महाराष्ट्र राज्यासाठी उद्या विचार करावा लागेल . या उपसा जल सिंचन योजना ताब्यात घेण्याचा वित्तीय खर्च मोठा आहे. त्यामुळे पूर्ण विचारांतीच निर्णय घ्यावयाचा आहे आणि सध्या तो विचार सुरु आहे.

प्रा.शरद पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटलेले आहे की, "राज्यातील सर्वच सहकारी उपसा जल सिंचन संस्थांच्या कर्जफेडीच्या दायित्वापोटी दिनांक 30.9.2006 अखेर एकरकमी कर्जपरतफेड सवलत योजनेअंतर्गत सवलत द्यावयाची झाल्यास रु.535 कोटी इतका निधी लागणार आहे. सदर रक्कम जलसंपदा विभागास उपलब्ध करुन देण्याबाबतचा प्रस्ताव सहकार विभागाच्या विचाराधीन आहे " तेव्हा राज्यातील सर्वच उपसा जल सिंचन योंजनांच्या संदर्भात निर्णय घ्यावयाचा म्हटले तर 535 कोटी रुपयांचा निधी लागणार असून हा फार मोठा निधी नाही.. तेव्हा संपूर्ण राज्यातील उपसा जल सिंचन योजना ताब्यात घेण्याच्या बाबतीत शासन तात्काळ निर्णय घेणार आहे काय ?

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी वारंवार सागितले आहे की, या निर्णयामुळे राज्याच्या तिजोरीवर मोठया प्रमाणावर आर्थिक भार पडणार असल्यामुळे अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सर्वार्थाने विचार करणे आवश्यक आहे आणि तो विचार सध्या सुरु आहे.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, या तीन जिल्हयातील सहकारी उपसा जल सिंचन योजना महामंडळाने ताब्यात घेण्याबाबतचा निर्णय कॅबिनेटने घेतला होता. त्यामुळे त्यावेळी पूर्ण विचारांती निर्णय झाला होता. त्यानंतर पुन्हा संपूर्ण महाराष्ट्राशी हा निर्णय निगडीत करुन याबाबतीत अजून विचार करुन पूर्ण विचारांती निर्णय घेऊ असे उत्तर देण्यात आलेले आहे. हे उत्तर उचित होणार नाही. या संदर्भात दोन टप्यात निर्णय घेण्यात आला पाहिजे. धुळे, नंदूरबार आणि जळगाव या तीन जिल्हयातील सहकारी उपसा जल सिंचन योजना ताब्यात घेण्याच्या बाबतीत महिना भरामध्ये म्हणजेच हे अधिवेशन संपूण्यापूर्वी निर्णय घेण्यात यावा आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी त्यानंतर निर्णय घेण्यात यावा. तेव्हा या प्रमाणे शासन निर्णय घेणार आहे काय ?

(सभापतीस्थानी :माननीय उपसभापती)

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, हा निर्णय झाल्यानंतर राज्याच्या इतर विभागांकडून तसेच तेथील लोकप्रतिनिधींकडूनही अशीच मागणी येईल की, या तीन जिल्ह्यांच्या बाबतीत जसा आपण निर्णय घेतला आहे तसाच आमच्या जिल्ह्यांसाठीदेखील शासनाने निर्णय घ्यावा आणि त्याचा दबावही वाढेल. हे लक्षात घेऊन याबाबतीत संपूर्ण विचार होणे आवश्यक आहे. म्हणूनच माननीय मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रात एकूण अशा किती उपसा सिंचन योजना आहेत याची माहिती घेण्यास सांगितले असून त्या सर्वच बाबतीत आपण असा निर्णय घेतल्यास किती आर्थिक बोजा पडणार आहे याचा अभ्यास आपण करीत आहोत. सध्या 1084 कोटी रूपयांचा भार पडणार आहे. म्हणून याला वेगवेगळे केले तरी उद्या आपल्यावर हा सारा भार पडणार आह हे लक्षात घेऊन याचा एकत्रित सर्वांगीण विचार करूनच निर्णय घेणे आवश्यक आहे असे मला वाटते.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.अरूणभाई गुजराथी आणि सन्माननीय सदस्य श्री.रघुवंशी यांनी वारंवार एकच प्रश्न विचारूनही त्याला मंत्री महोदयांकडून योग्य असे उत्तर मिळत नाही. मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगेन की, आपण जरूर पूर्ण राज्याची काळजी घ्या, त्यासाठीच आपल्याला मंत्री पद मिळालेले आहे. परंतु अगोदर या तीन जिल्ह्यांसाठी आपण नेमकी योजना केली होती आणि त्यानुसार या तीन जिल्ह्यातील सर्व उपसा सिंचन योजना शासन आपल्याकडे घेणार होते, तसा निर्णय देखील झाला होता. व त्यासाठी जिल्हा बँकांनी 200 कोटी रूपयांचे अर्थसहाय्य देण्याचीही तयारी दर्शविली होती. असे असताना आणि मंत्रिमंडळाने यासाठी मान्यता दिली असताना, माननीय मुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री यांनी त्या जिल्ह्यांमध्ये जाऊन तशी घोषणा केली असतानाही प्रत्यक्षात मात्र त्यापासून राज्य शासन आता मागे जात आहे हे बरोबर नाही. तेव्हा मंत्रिमंडळाने मान्यता दिली त्याप्रमाणे या तिन्ही जिल्ह्यांपुरते तरी आपण प्रथमत: हा निर्णय राबविणार आहात की नाही ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, याचे उत्तर मी अगोदरच दिलेले आहे की, ही अडचण एका तीन जिल्ह्यांपुरती नाही. या तीन जिल्ह्यांचा प्रश्न गंभीर आहे यात दुमत नाही. परंतु महाराष्ट्र सरकारला याचा निर्णय घेताना संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करावा लागेल. सभापती महोदय, या तीन जिल्ह्यातील उपसा सिंचन योजना ताब्यात घेतल्या तर राज्यातील इतर विभागातील जिल्ह्यांतील योजना देखील शासनाने ताब्यात घ्याव्यात म्हणून मागणी येईल आणि मग त्यांचा भार शासनावर पडणार आहे. तेव्हा त्या सगळ्याचाच विचार करून आपल्याला यावर निर्णय घ्यावा लागेल आणि तो शासन लवकरच घेईल. ..... पी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, याचा संपूर्ण विचार करून हे अधिवेशन संपण्यापूर्वी तरी आपण निर्णय याबाबत घेणार काय ? कारण एकदा याबाबत निर्णय जाहीर करूनही आपण माघार घेत आहात.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, याबाबतचा निर्णय या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्येच घेण्याचा आम्ही शक्यतो प्रयत्न करू.

श्री. दिलीप सोनवणे : सभापती महोदय, या संदर्भात जो प्रश्न ऑलरेडी संपलेला आहे, धुळे, नंदूरबार व जळगाव या तीन जिल्ह्यांच्या बाबतीत एकदा निर्णय घेतल्यानंतर आता पुन्हा साऱ्या महाराष्ट्राचा एकत्रित विचार करून याबाबत निर्णय घेणार आहोत असे जे उत्तर शासनाकडून दिले जात आहे ते बरोबर नाही. वास्तविक या तीन जिल्ह्यांच्याबाबतीत अगोदरच शासनाचा निर्णय झालेला आहे, शिवाय जिल्हा बँका देखील यासाठी सहकार्य करण्यास तयार आहेत. तेव्हा याबाबतीत या अधिवेशन काळातच याबाबत निर्णय आपण घेणे आवश्यक आहे, तसा तो आपण घेणार का ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सध्या तरी 1084 कोटीचा हा भार आहे. पूर्ण महाराष्ट्र राज्यातील उपसा सिंचन योजना शासनाने घ्यायच्या म्हटले तर हा भार 2 हजार कोटी पर्यंत जाऊ शकेल आणि म्हणूनच मी म्हटले की, या बाबत सर्वंकष विचार करणे आवश्यक आहे आणि आम्ही त्या दृष्टीने विचार करीत आहोत.

***

..... पी 3 ...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंद

पृ. शी. : अमरावती शहराची भुयारी गटार योजना व पाणीपुरवठा योजना.

मु. शी. : अमरावती शहराची भुयारी गटार योजना व पाणीपुरवठा योजना यासंबंधी प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री व्ही.यू.डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, सदाशिवराव पोळ, भास्कर जाधव, श्रीमती मंदा म्हात्रे, प्रा.फौजिया खान, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा. बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"केंद्र शासन पुरस्कृत लहान व मध्यम शहरांकरिता पायाभूत सुविधांच्या विकास कार्यक्रमांमध्ये अमरावती शहराची भुयारी गटार योजना व पाणीपुरवठा योजना या दोन प्रकल्पांना केंद्र शासनाकडून निधी उपलब्ध न झाल्यामुळे काम अजूनही सुरू न होणे, इतर विभागीय मुख्यालयांच्या शहरांशी तुलना केली असता अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील अमरावती या एकमेव विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी भुयारी गटार योजना अस्तित्त्वात नसणे, विकसित भागातील विभागीय मुख्यालय नसलेल्या जिल्हा मुख्यालयाने कर्जफेड बरोबर न केल्यामुळे अमरावती शहराला हुडकोने कर्ज नाकारणे, अतिअनुशेष असलेल्या जिल्ह्याचे हे मुख्यालय आहे, ही बाब लक्षात घेऊन मंत्रिमंडळाने विशेष बाब म्हणून भुयारी गटार योजनेला 10 टक्के लोकवर्गणी क्षमापित करणे, असे असले तरी यवतमाळ जिल्ह्यातील वणी शहराप्रमाणे कोट्यवधी रूपये खर्च झालेली अमरावती शहराची भुयारी गटार योजना जमिनीतच दबून राहण्याची निर्माण झालेली शक्यता, केंद्र शासनाकडून या दोन्ही योजनांसाठी निधी मिळविण्यास शासनाला आलेले अपयश, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष व याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री. राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..... पी 4 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सूचनेवरील (क्र.2) नगरविकास राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर..)

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मला सांगावयास अतिशय दु:ख होत आहे की, महाराष्ट्रामध्ये अनुशेषाच्या आधारे अमरावतीला प्रथम प्राधान्याने योजना देणे आवश्यक असताही त्याबाबत शासनाकडून कोणतीही कारवाई होत नाही वा झालेली नाही. राज्यातील इतर विकसित भागातील योजना मात्र एका मागोमाग केल्या जात आहेत. मात्र मागास भागातील योजनेच्या बितीत मात्र या निवेदनातच आपण सांगितले आहे की ही योजना किती वर्षापासून चालू आहे. अमरावती शहरातील भुयारी गटार योजनेचा प्रश्न 22 एप्रिल 1983 ला या सभागृहामध्ये ता.प्र.क्र.19532 द्वारा आला होता आणि त्यावेळी शासनाकडून सांगण्यात आले होते की, सदर योजना जागतिक बँकेकडून होण्यासाठी केंद्र सरकारकडे शिफारस केलेली आहे. त्यानंतर पुन्हा ता.प्र.क्र. 508 अन्वये 10 जुलै 1985 मध्ये हा प्रश्न सभागृहात आला होता तेव्हाही हेच उत्तर दिले गेले होते. पुढे त्याबाबतीत काहीच झालेले नाही. सभापती महोदय, यवतमळा जिल्ह्यातील वणी शहरासाठी देखील यापूर्वी 1976 मध्ये भुयारी गटार योजना केली होती पण ती योजना भुयारातच पडली. आता या अमरावती शहराची भुयारी गटार योजना देखील भुयारातच दबली जाणार आहे किंवा काय अशी साधार शंका सरकारच्या याकडे पाहण्याच्या दृष्टीतून येते आहे. सभापती महोदय, मी एक गोष्ट येथे अतिशय दु:खाने सांगू इच्छितो की, आम्हाला हुडकोने लेखी कळविले आहे की, जिल्हा मुख्यालयाने कर्जफेड बरोबर न केल्यामुळे कर्ज नाकारले आहे. परंतु या योजनेचे महत्त्व लक्षात घेऊन मंत्रिमंडळाने यासाठीची 10 टक्के लोकवर्गणी देखील माफ केलेली आहे. ...

(यानंतर श्री. सरफरे .... क्यू 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख....

या संदर्भात दिनांक 28 सप्टेंबर 2006 रोजी राज्य पातळीवरील सँक्शनिंग कमिटीची बैठक झाली. त्या बैठकीमध्ये नगर विकास विभागाचे सचिव काय म्हणाले त्याचे मिनिट्स माझ्याकडे उपलब्ध असून मी त्यातील वाक्य आपणास वाचून दाखवितो. ते म्हणाले की, "अरे बॅकलॉग भागातील, विदर्भातील एखाद-दुसरी योजना पाठवा" पुढे ते असे म्हणाले की, Mr. Phatak further observed that with a view to retain regional balance some 2 to 3 cities from Vidharbha and other parts be included in the current years sanction".सभापती महोदय, त्यानंतर दिनांक 6.12.2006 रोजी सभागृहामध्ये या विषयावर प्रश्न मांडण्यात आला. त्यावेळी माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, पुढील बैठकीमध्ये या योजना पाठविण्यात येतील त्याप्रमाणे त्यांनी या योजना पाठविल्याबद्दल मी माननीय राज्यमंत्र्यांचे आभार मानतो. ही पाणी पुरवठयाची योजना असून तिला निधी दिला जात नाही. दांडेकर समितीने काढलेल्या अनुशेषामध्ये महाराष्ट्रात सर्वात जास्त नागरी पाणी पुरवठा योजनेचा अनुशेष विदर्भात आहे. त्यामध्ये नंबर एक वर अमरावती हे नामांकित शहर आहे. या शहरामध्ये दर दिवशी 32 दशलक्ष लिटरचा अनुशेष आहे. आता पाणी आलेले आहे, परंतु त्याचे डिस्ट्रिब्युशन होत नाही अशी ही योजना आहे. सभापती महोदय, माझे पॉईंटेड म्हणणे असे आहे की, माननीय पालक मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली सर्वपक्षीय शिष्टमंडळ घेऊन माननीय केंद्रीय मंत्री श्री. जयपाल रेड्डी यांना भेटलो. या शिष्टमंडळामध्ये श्री. प्रभाकरराव वैद्य होते, शिवसेनेचे श्री. सोमेश्वर पुसदकर होते व मी स्वत: होतो. त्यावेळी ते आम्हाला म्हणाले की, हे अनुशेषाचे तुम्ही मला कशाला सांगता? तुमच्या मुख्यमंत्र्यांनी लिहिले तर आम्ही प्रॉयॉरिटी देवू. आज परिस्थिती अशी आहे की, राज्य सरकार ज्या योजनेला प्रॉयॉरिटी देते त्याप्रमाणे ते निधी देतात. ज्याप्रमाणे जागतिक बँकेची पंगत उठून गेली त्याप्रमाणे उद्या जवाहरलाल नेहरु योजनेची ही पंगत देखील उठून जाईल. आणि मग पुन्हा बॅकलॉगमधील गावे बॅकलॉगमध्ये राहतील. माझा पॉईंटेड मुद्दा असा आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी या योजनेला प्रॉयॉरिटी आहे असे स्पष्टपणे सांगितले पाहिजे असे केंद्रीय मंत्र्यांनी आम्हाला सांगितले. अनुशेषाच्या या दोन्ही बाबीमध्ये एक डिव्हिजन आणि एक हेडक्वॉर्टर आहे असे आपण आम्हाला दाखवा. एक डिव्हिजन आणि एक हेडक्वॉर्टर आहे त्या ठिकाणी भुयारी गटार योजना नाही. प्रश्न असा आहे की, या दोन्ही योजना अनुशेषाच्या शिरोभागी असणाऱ्या आहेत. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ KGS/

प्रा. बी. टी. देशमुख....

योजनांकरिता ताबडतोबीने निधी सर्वप्रथम रिलिज केला पाहिजे अशाप्रकारे माननीय मुख्यमंत्र्यांचे पत्र केंद्रीय मंत्र्यांकडे जाऊन आपण ठामपणे या सभागृहाला सांगावे की, यानंतर येणारा निधी या दोन योजनांना दिला जाईल. याव्यतिरिक्त दुसऱ्या योजनांना दिला जाणार नाही?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख साहेबांनी दिलेली माहिती खरी आहे. अमरावतीच्या दोन प्रोजेक्टमध्ये भुयारी गटार योजना आणि पाणी पुरवठा योजनेचा समावेश आहे. भुयारी गटार योजनेच्या संदर्भात सांगावयाचे झाले तर ही योजना पूर्वी राज्य स्तरावरील योजनेमधून अर्धवट स्थितीमध्ये घेतली होती. आता उर्वरित 160 कोटींची योजना वाढीव क्षेत्रासाठी आहे. ही योजना यु.आय.डी.एस.एस.एम.टी. कडे पाठविली आहे. सभापती महोदय, मी आपणास यु.आय.डी.एस.एस.एम.टी. ची नियमावली थोडक्यात सांगू इच्छितो. दोन वर्षापूर्वी राज्यामध्ये व देशामध्ये ही योजना सुरु झाली आहे. त्यामध्ये कोणती योजना प्रॉयॉरिटीने राज्य सरकारने पाठवावी अशाप्रकारचे नियम नव्हते. म्हणून फर्स्ट कम फर्स्ट सर्व्ह अशाप्रकारे स्टेट लेव्हल सँक्शनिंग कमिटीकडे ज्यांनी डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट पाठविले आहेत ते जसे आले त्याप्रमाणे ते मंजूर करुन राज्य सरकारने केंद्र सरकारकडे पाठविले. त्यामध्ये 61 शहरांमध्ये 2371 कोटी रुपयांच्या 81 प्रकल्पांचा समावेश आहे. त्यामध्ये महाराष्ट्र हे एक नंबरचे राज्य आहे. याकरिता नगर विकास विभागाने सर्वात जास्त निधीची मागणी करुन सर्वात जास्त डिटेल रिपोर्ट स्टेट लेव्हल सँक्शनिंग कमिटीने मंजूर करुन पाठविले आहेत. आणि आता त्यांच्याकडून आम्ही निधीची अपेक्षा करीत आहोत. यामध्ये योजना मंजूर करीत असतांना छोटया योजनांना प्राधान्य देऊन त्यामध्ये जास्तीत जास्त शहरे कव्हर करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे 8, 9, 10 कोटींच्या छोटया छोटया योजनांना मंजूरी देऊन त्या पाठविल्या. आणि आज जवळ जवळ 19 शहरांमध्ये 25 प्रकल्पांसाठी 191 कोटी रुपयांचे वितरण केले आहे. आणि 508 कोटी रुपयांना मंजूरी दिली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . . .

सभापती महोदय, मी थोडक्यात माहिती सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी प्रश्नाच्या माध्यमातून पॉईंटेड उत्तराची अपेक्षा केलेली आहे. त्यानुसार सांगावयाचे तर एक गोष्ट नक्कीच आहे. केंद्र शासनाच्या नगरविकास विभागाने सहा-सात महिन्यापूर्वी अशी अपेक्षा व्यक्त केली होती की,राज्य शासनाने कामांच्या बाबतीत प्रॉयॉरिटी लिस्ट पाठवावी. त्यानुसार राज्य शासनाने जी यादी पाठविलेली आहे, त्यात अमरावती शहराच्या योजनांचा उल्लेख क्र.5 वर आहे.या यादीतील पहिल्या चार क्रमांकावरील ज्या योजना आहेत, त्या मंजूर झाल्या असून त्यासाठी निधी देखील वितरित झालेला आहे. त्यामुळे अमरावती शहराची भुयारी गटार योजना ही यादीमध्ये क्रमांक 1 वरच आहे. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी केलेल्या सुचनेप्रमाणे आणि आता ही योजना यादीमध्ये क्रमांक 1 वरच असल्यामुळे, प्राधान्यानुसार अमरावती शहराची भुटारी गटार योजना ही माननीय मुख्यमंत्र्यांच्या यादीमध्ये प्रॉयॉरिटी क्रमांक 1 वर पाठविण्यात येईल, हे मी यानिमित्ताने सदनाला सांगू इच्छितो. तसेच याठिकाणी पाणीपुरवठा योजनेच्या अनुशेषाच्या संबंधात जी अपेक्षा व्यक्त केली आहे, त्याला सुध्दा निश्चितपणे प्राधान्य दिले जाईल. त्याचप्रमाणे एका मागासलेल्या विभागाच्या दृष्टीकोनातून पाहता, या योजना लवकर मंजूर होतील आणि त्यासाठी लवकरात लवकर निधी वितरित होईल याचा सुध्दा मी पाठपुरावा करीन. याबाबतीत मी स्वत: लक्ष देईन हे मी सदनाला सांगू इच्छितो.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आता माननीय मंत्री महोदयांनी येथे उत्तर दिलेले आहे. एकतर त्यांनी असे सांगावे की, या योजना अनुशेषाच्या निकषामध्ये कुठेच बसत नाहीत. मात्र त्याबाबतीत माझे पॉईंटेड म्हणणे आहे की, या दोन्ही योजना या निकषामध्ये शिरोभागी आहेत. राज्य शासनाने पाठविलेल्या यादीमध्ये या योजनांचा क्रमांक पाचवा लावण्यात आला. त्यापूर्वी विकसित भागातील कोणकोणत्या योजना आहेत ? त्यांची नावे सदनामध्ये वाचून दाखविणे हे मलाच लाजिरवाणे वाटत आहे, ते योग्य वाटत नाही. बैठकीमध्ये विभागाच्या सचिवांनी जे सांगितले, ते मिनिटस्मध्ये आलेले आहे. मी ते येथे सांगत नाही. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सुरवातीला "फर्स्ट कम फर्स्ट सर्व्ह" असे होते.पण आता तुम्ही शिफारस करावयाची आहे. माननीय मुख्यमंत्री या विभागाचे प्रमुख आहेत. माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, मी याबाबतीत स्वत: पाठपुरावा करीन. माझे असे पॉईंटेड म्हणणे आहे की, जर तुम्ही ही बाब

. . . .आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख . . . .

बरोबर आहे असे सभागृहामध्ये मान्य करीत असाल तर माझे म्हणणे असे आहे की, अमरावती शहराची भुयारी गटार योजना व पाणीपुरवठा योजना या दोन्ही बाबी अनुशेषाच्या शिखरावरील आहेत. माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, मी स्वत: पाठपुरावा करीन. अशा वेळी या योजनांसाठी टॉप प्रॉयॉरिटीने निधी उपलब्ध करुन द्यावा असे माननीय मुख्यमंत्र्यांचे पत्र देण्यात यावे. यासंबंधातील बैठकीच्या वेळी आम्ही गावातील सर्व लोक उपस्थित होतो. त्यावेळी संबंधितांनी पॉईंटेड सांगितले आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्र द्यावे, मी देईन. मी आपल्याला सांगू इच्छितो की, परवा माननीय राज्यपालांनी डायरेक्शन्स् काढलेल्या आहेत. त्यानुसार महाराष्ट्रातील जल सिंचनाच्या शिल्लक अनुशेषापैकी 77 टक्के अनुशेष या पाच जिल्हयांमध्ये आहे आणि विदर्भातील अनुशेषापैकी 99.22 टक्के अनुशेष या पाच जिल्हयांमध्ये आहे. 5 लाख लोकसंख्या असलेल्या या गावातील माणसे पिण्यासाठी 100 टक्के बोअरचे पाणी वापरत होते. माननीय मंत्री महोदय देखील मागासलेल्या भागाचे प्रतिनिधीत्व करतात. त्यामुळे त्यांनी या चर्चेच्या निमित्ताने तीन प्रश्नांची पॉईंटेड उत्तरे द्यावीत. एक म्हणजे याबाबतीत माननीय केंद्रीय मंत्री महोदयांना आठ दिवसामध्ये पत्र पाठविले पाहिजे. दुसरे म्हणजे माननीय केंद्रीय मंत्री महोदयांना पाठवावयाच्या पत्रामध्ये असा उल्लेख केला पाहिजे की, आमच्या प्रॉयॉरिटी लिस्टमध्ये अमरावती शहरातील या दोन्ही योजना पहिल्या क्रमांकावर आहेत. मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, मी स्वत: याबाबतीत पाठपुरावा करीन, तर त्याप्रमाणे तो केला पाहिजे. तसेच या कामांची सिन्सिॲरिटी लक्षात घेऊन ताबडतोब या दोन्ही कामांच्या बाबतीत टेंडर काढण्याचे आदेश दिले पाहिजेत. तसे आपण करणार आहात काय ? या तीन प्रश्नांची पॉईंटेड उत्तरे देण्यात यावीत.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय,मी मान्य केले आहे की, हा भाग अनुशेषाचा आहे आणि याठिकाणी पाणीपुरवठयाच्या बाबतीत सुध्दा अनुशेष आहे.त्यामुळे येथे प्राधान्य देणे निश्चितपणे आवश्यक आहे.भुयारी गटार योजनेच्या बाबतीत मी मघाशी स्पष्टपणे सांगितले आहे की, सुरुवातीला या योजना यादीमध्ये पाचव्या क्रमांकावर होत्या. आता त्यापूर्वीच्या चार योजना मंजूर होऊन त्याचा निधी देखील प्राप्त झालेला आहे. त्यामुळे आता वेटींग लिस्टमध्ये क्रमांक 1 वर अमरावती शहराची भुयारी गटार योजना आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत त्यासाठी प्राधान्य दिले जाईल. अनुशेषाच्या बाबतीत सुध्दा राज्य शासनानेच प्रॉयॉरिटी ठरवावयाची आहे. अशा वेळी

. . . .आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निश्चितपणे अनुशेष हा क्रायटेरिया धरुन प्रॉयॉरिटी ठरविण्याच्या बाबतीतील नवीन धोरण सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून निश्चितपणे करु. कोणत्याही परिस्थितीत ज्या भागामध्ये अनुशेष आहे, मग तो पाणीपुरवठयाच्या बाबतीत असेल तर त्याला प्राधान्य देण्याच्या बाबतीत निश्चितपणे विचार केला जाईल. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना सुध्दा या सभागृहाचे आणि सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुखसाहेबांचे म्हणणे निश्चितपणे सांगेन. तसेच मी यासाठी पाठपुरावा करीन. मी आश्वासन देतो की, स्वत: त्यामध्ये लक्ष घालून निधी मिळविण्यासाठी, वितरित करण्यासाठी प्रयत्न करीन. तसेच टेंडर सुध्दा ताबडतोब काढण्याची कार्यवाही करण्यात येइर्ल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्याकडे हा विभाग आहे आणि या विभागाला, तुम्हाला जी गोष्ट पटलेली आहे, ती तुम्ही केंद्र शासनाला आठ दिवसामध्ये कळविणार आहात काय ?

उपसभापती : माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत "होय" असे सांगितलेले आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय जर असे म्हणत असतील की, माननीय मुख्यमंत्री दहा दिवसामध्ये केंद्र शासनाला अशा प्रकारचे पत्र पाठवतील. तर मी खाली बसतो.

उपसभापती : माननीय मुख्यमंत्री दहा दिवसामध्ये पत्र पाठवतील असे माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. असे पत्र पाठविण्यास काही हरकत नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, होय.

यानंतर श्री.बरवड . . . .

अशुधारित प्रत / शीघ्रलेखीय नोंदी

पृ. शी. : कामगार कल्याण केंद्र, गांधीनगर, वांद्रे (पूर्व) येथील व्यायाम शाळेसाठी पर्यायी जागा न मिळाल्यामुळे होत असलेली गैरसोय

मु. शी. : कामगार कल्याण केंद्र, गांधीनगर, वांद्रे (पूर्व) येथील व्यायाम शाळेसाठी पर्यायी जागा न मिळाल्यामुळे होत असलेली गैरसोय यासंबंधी ॲड. अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

पृ. शी. : गडचिरोली जिल्ह्यात सागवान लाकडाची मोठ्या प्रमाणात होत असलेली चोरी

मु. शी. : गडचिरोली जिल्ह्यात सागवान लाकडाची मोठ्या प्रमाणत होत असलेली चोरी यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, सागर मेघे, रणजिसिंह मोहिते-पाटील, भास्कर जाधव, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भास्कर जाधव (रायगड तथा रत्नागिरी तथा सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गडचिरोली जिल्ह्यातील इंद्रावती व गोदावरी नद्यांच्या संगमाजवळ असलेल्या 150 कि.मी.च्या परिसरात सागवान लाकडाची मोठया प्रमाणात चोरी होणे, गेल्या 3 महिन्यांत वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दीड कोटी रुपयांचे सागवान लाकूड जप्त करणे, सागवानी लाकडाच्या या तस्करीला नक्षलवाद्यांच्या 'प्रतिघटना' या संघटनेचा पाठिंबा असणे, सागवान तस्करी रोखण्यासाठी वन खात्याने 94 ऐवजी फक्त 50 वनरक्षक नेमल्यामुळे या संधीचा फायदा घेत गुमालकोंडा, नदीगुडा, पोचमपल्ली, रायपेठा या गावातील लोकांनी घनदाट जंगलात शिरुन तस्करांनी सागवानी झाडे तोडून नेणे, नक्षलवाद्यांच्या 'प्रतिघटना' या संघटनेला काही गावातील लोकांचा सक्रीय पाठिंबा मिळणे, त्यामुळे सागवान तस्करीचे प्रमाण कित्येक पटीने वाढणे, कोट्यवधी रुपयांची जंगलतोड होऊन पर्यावरणाची होणारी हानी व याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

श्री. बबनराव पाचपुते (वने मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना गडचिरोली जिल्ह्याच्या संदर्भात आहे. अतिशय मौल्यवान अशा सागाच्या चोरीची प्रकरणे आणि तस्करीची प्रकरणे यासंदर्भात ही लक्षवेधी सूचना आहे. सध्या जंगलतोड हाच मुख्यत्वे कार्यक्रम अधिकाऱ्यांना राहिलेला आहे की काय अशी शंका उत्पन्न व्हावी अशी परिस्थिती आहे. अनेक उपाययोजना केलेल्या आहेत आणि अनेक उपाययोजना केल्यानंतर सागाच्या तस्करीचे प्रमाण कमी झाले आहे असे माननीय मंत्रिमहोदयांनी या निवेदनामध्ये सांगितले आहे. या निवेदनामध्ये सांगितल्याप्रमाणे 2005 साली जी चोरी पकडली गेली त्यात जप्त करण्यात आलेल्या मालाची किंमत 2,42,09,334 रुपये होती. 2006 मध्ये 2,69,69,444 रुपये आणि 2007 मध्ये 2,54,65,251 रुपये एवढ्या किमतीच्या मालाची चोरी पकडली गेली. ही आकडेवारी पाहिल्यानंतर या ठिकाणी चोरीचे प्रमाण कमी झाले आहे असे शासनाला म्हणता येईल असे वाटत नाही. या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, वारंवार चोऱ्या करणाऱ्या लोकांवर कलम 395 अंतर्गत गुन्हे दाखल करतो. कलम 395 अंतर्गत किती गुन्हे दाखल केले ? निवेदनामध्ये असे सांगितले आहे की, या चोरीला आळा घालण्याच्या दृष्टीने वनसंरक्षक व उपवनसंरक्षक दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आंतरराज्य बैठकांचे आयोजन दर तीन महिन्यातून करण्यात येते. अशा किती बैठका आयोजित झाल्या ? माझ्या माहितीप्रमाणे केवळ वनसंरक्षकांवर फार मोठी जबाबदारी टाकली जाते. वरिष्ठ दर्जाचे अधिकारी त्या भागामध्ये फिरत नाहीत किंवा वनाच्या ठिकाणी जाऊन नक्षलवाद्यांना आणि चोरी करणाऱ्या लोकांना फेस करण्याचे धाडस किंवा त्यांना विरोध करण्याचे धाडस वरिष्ठ अधिकारी दाखवत नाहीत. या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या तीन महिन्यातून घ्यावयाच्या बैठका किती घेतल्या ? कोणत्या दर्जाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्या विभागात किती वेळा भेटी दिल्या यासंदर्भात शासन माहिती देईल काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पूर्ण लक्षवेधी सूचनेवर एकदम प्रश्न विचारलेले आहेत. हे खरे आहे की, त्या ठिकाणी सिरोंचा भागात घनदाट जंगल आहे. त्या ठिकाणी तीनही बाजूने नद्या आहेत आणि मध्ये हा आमचा विभाग आहे. त्या ठिकाणी काही उपाययोजना केलेल्या आहेत. या उपाययोजना केल्या म्हणूनच या वर्षी कमी प्रमाणात घटना घडलेल्या आहेत. चोरीला गेलेला जो माल पकडला त्याची किंमत जास्त आहे असे सन्माननीय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ KGS/

श्री. बबनराव पाचपुते .....

सदस्यांनी सांगितले. हा माल केवळ आपल्याच क्षेत्रातील नाही. आंध्रप्रदेशमध्ये सुध्दा लाकडे नदीमध्ये टाकून वाहून नेली जातात. आपण त्या ठिकाणी मोटार लाँच दिलेली आहे. त्या ठिकाणी गस्तीचा कार्यक्रम चांगल्या प्रकारे होत असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर लाकडे जप्त केली जातात. यामध्ये जे ठराविक लोक आहेत त्याची यादी तयार करुन पोलिसांना दिलेली आहे. फौजदारी संहितेच्या कलम 110 अन्वये 199 गुन्हे पोलिसांना कळविलेले आहेत तसेच भा.दं.सं. कलम 395 च्या संदर्भातील 192 घटना घडलेल्या आहेत. समोरच्या राज्यातील आणि आपल्या राज्यातील अधिकाऱ्यांच्या सातत्याने बैठका होत असतात. छत्तीसगड, आंधप्रदेश तसेच आपले राज्य अशा तीनही राज्यांनी नक्षवादविरोधी भूमिका घेतलेली आहे. त्याबाबतीत तीन महिन्याने बैठका होतात. आतापर्यंत अशा 8 बैठका झालेल्या आहेत. उच्चस्तरीय बैठका सुध्दा होतात. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, वरिष्ठ अधिकारी त्या ठिकाणी जात नाहीत. वरिष्ठ अधिकारी त्या ठिकाणी जावयास लागले आहेत. म्हणूनच या गोष्टी थांबलेल्या आहेत. त्या ठिकाणी त्यांनी चांगल्या प्रकारे वृक्षतोडीवर नियंत्रण आणलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते.....

त्याठिकाणी तेंदू पत्त्याचा बोनस देण्याची सुरुवात केल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न कमी होत आहे. त्याचप्रमाणे त्या भागामध्ये रो.ह.यो.ची कामे मोठया प्रमाणावर घेतली आहेत आणि तेंदू पत्त्यापासून मिळणारे बोनस पैसे यामुळे या घटना कमी घडत आहेत. त्या भागामध्ये लक्ष देण्यासाठी वाहनांची व्यवस्था करावी लागणार आहे तशी व्यवस्था थोडया दिवसामध्ये केली जाईल, त्यातून चोरीचे प्रमाण घटविता येईल. या कामामध्ये पोलिसांचे चांगल्या प्रकारचे सहकार्य मिळत आहे. त्यातून लाकूड तोडीवर नियंत्रण आणण्याचे काम केलेले आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, त्याठिकाणी जे वनरक्षक आहेत त्यांच्यावर 70-70, 80-80, 100-100 लोकांच्या टोळीने हल्ला करतात आणि त्यांना जेरीला आणतात. त्यामध्ये मोठया प्रमाणात नक्षलवादी लोक सहभाग घेतात तसेच जबरदस्तीने लोकांना चोरी करावयास लावतात. वनरक्षकांनाच या सर्व परिस्थितीला तोंड द्यावे लागते. वरिष्ठ अधिकारी कधी नसतातच. म्हणून वनरक्षकाच्या जीविताच्या दृष्टीने संरक्षणाचा उपाय म्हणून त्यांना शस्त्रे दिली आहेत काय, नसल्यास, देण्याचा विचार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते : विभागाकडे सर्व प्रकारची शस्त्रे आणलेली आहेत आणि ती वापरण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देण्याचे काम चालू आहे. फक्त नक्षलवादी भागामध्ये केवळ 3-4 वनरक्षकांना शस्त्र देणे योग्य होणार नाही. ग्रुप करुन फिरण्याच्या वेळी शस्त्रे वापरली जातील. 2 वेळा शस्त्रांचा वापर केल्यामुळे चोरी करणा-या लोकांमध्ये दहशत निर्माण झालेली आहे. आपल्याकडे सर्व प्रकारची शस्त्रे आहेत मग कार्बाईन असो, रायफल असो, पिस्तुल असो. त्याबाबत प्रशिक्षण देऊन, ते ठेवण्याची व्यवस्था केल्यानंतर या भागात ताबडतोब त्यांचे वितरण केले जाईल.

उपसभापती : आता मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक 3.15 पर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.38 ते 3.15 पर्यंत स्थगित झाली.)

नंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

<u>विशेष उल्लेख</u>

पृ. शी. : विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने मूळ वेतनात महागाई वेतन समाविष्ट करुन प्रोत्साहन भत्ता लागू करण्याची केलेली मागणी

मु. शी. : विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने मूळ वेतनात महागाई वेतन समाविष्ट करुन प्रोत्साहन भत्ता लागू करण्याची केलेली मागणी याबाबत श्री. व्ही. यू. डायगव्हाणे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"आदिवासी भागात काम करणा-या अधिकारी/कर्मचारी, खाजगी शाळा- शिक्षक/कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता परिगणित करतांना मूळ वेतनात महागाई वेतन समाविष्ट करुन देण्यात आला आहे. संचालनालय, लेखा व कोषागारे यांचे दिनांक 3.2.2007 अन्वये कोषागार अधिकारी (सर्व) यांना सहसंचालक (तांत्रिक) लेखा व कोषागार, मुंबई यांचे दिनांक 6.2.2007 चे पत्राने सदर "प्रोत्साहन भत्ता मंजूर करण्यासाठी परिगणना करताना मूळ वेतनात महागाई वेतनाचा समावेश होत नाही" असे कळविले आहे. या दोन्ही विसंगत निर्णयामुळे पूर्वी दिलेला जादा प्रोत्साहन भत्ता वसूल केला जात आहे. महागाई वेतन मूळ वेतनाचाच एक भाग असल्याने शासकीय, निमशासकीय व शिक्षक कर्मचारी संघटनांनी पूर्वीप्रमाणे मूळ वेतनात महागाई वेतन समाविष्ट करुनच प्रोत्साहन भत्ता लागू करावा अशी मागणी केली आहे. या मागणीसाठी विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने दिनांक 20 ऑक्टोबर 2007 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे आंदोलन केले. या गंभीर विषयाबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : महाराष्ट्र अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियम 1954 मधील कलम 20(1) मध्ये केलेली दुरुस्ती रद्द करण्याची व्यापा-यांनी केलेली मागणी

मु. शी. : महाराष्ट्र अन्न भेसळ प्रतिबंधक अधिनियम 1954 मधील कलम 20(1) मध्ये केलेली दुरुस्ती रद्द करण्याची व्यापा-यांनी केलेली मागणी याबाबत प्रा. शरद पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य प्रा. शरद पाटील यां□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदवीधर) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

"महाराष्ट्र शासनाने अन्न व भेसळ प्रतिबंध अधिनियम 1954 यामध्ये सुधारणा करुन खाद्य पदार्थात भेसळ आढळल्यास त्या पदार्थाची विक्री करणा-या व्यापा-यावर वारंटशिवाय अटक करण्याची व दखलपात्र अजामीनपात्र गुन्हा नोंदवण्याची तरतूद केल्यामुळे नवी मुंबई (वाशी) येथील व्यापा-यामध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व भितीचे वातावरण, ही तरतूद लागू केल्यामुळे पोलीस अधिका-यांच्या हातात व्यापा-यांची पिळवणूक करण्याचे अधिकार मिळाल्यामुळे त्यांच्याकडून या अधिकारांचा गैरवापर होण्याची शक्यता असून ही जाचक तरतूद रद्द करण्यात यावी अशी व्यापारी वर्गाची मागणी असून त्यांची दखल घेऊन शासनाने महाराष्ट्र अन्न भेसळ प्रतिबंध अधिनियम 1954 मधील कलम 20(1) रद्द करण्याचा प्रस्ताव विधिमंडळाकडून मंजूर करुन द्यावा अशी या विशेष उल्लेखाद्वारे मागणी करीत आहे."

...3...

पृ. शी. : राज्यात पडलेल्या अवकाळी पावसामुळे पिकांच्या झालेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नुकसानीबाबत आर्थिक सहाय्य देण्याची केलेली मागणी

मु. शी. : राज्यात पडलेल्या अवकाळी पावसामुळे पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत आर्थिक सहाय्य देण्याची केलेली मागणी याबाबत श्री. संजय दत्त वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य श्री. संजय दत्त यां□□ ए□ विशेष उल्ले□ची सूच□□ दिली आहे. त्यां□□ ती मांडावी.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□□ मांडतो.

"राज्याच्या कोकण, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाडा या विविध भागातील रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, नगर, पुणे, सांगली, सातारा, औरंगाबाद, लातूर, परभणी, भंडारा, चंद्रपूर, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांमध्ये पावसाच्या मोसमापूर्वी अवकाळी पावसाने थैमान घातल्याने तेथील द्राक्ष, कांदा, गहू, बेदाणा, बाजरी, हरभरा, ज्वारी तसेच कोकणातील आंबा, काजू, सूर्यफूल, मिरची इत्यादी पिकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले आहे. कोकणातील आंब्याचा मोहर गळून पडला आहे. त्याचप्रमाणे शेतीला जोडधंदा असलेल्या वीटभट्टयांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. हातचे पीक वाया गेल्याने राज्यातील शेतकरी हवालदिल झाला आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीपासून तातडीने नुकसान भरपाई देऊन शेतक-यांना आर्थिक संरक्षण देण्याची आवश्यकता आहे. या सार्वजनिक आणि राज्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या विषयाबाबत विशेष उल्लेखाची सूचना दाखल करीत आहे, कृपया स्वीकृत करावी."

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सभागृहाला गेले चार दिवस सुट्टी होती. आज सभागृहाचे कामकाज सुरु झालेले आहे. या सभागृहात दिनांक 19 मार्च, 2008 रोजी अर्थसंकल्प सादर केला गेला. त्यावेळेला माननीय विरोधी पक्ष नेते तसेच माननीय विरोधी पक्षाचे सदस्य सभागृहात उपस्थित नव्हते. आज विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित आहेत. परंतु ते आजही सभागृहाच्या कामकाजात भाग घेत नाहीत. आपण सभागृहात एखाद्या सदस्यांचे नाव घेऊन प्रश्न पुकारला व तो सदस्य सभागृहात उपस्थित नसेल तर तो प्रश्न लॅप्स होतो. ही गोष्ट मी समजू शकतो. परंतु या ठिकाणी आपण विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करण्यासाठी सन्माननीय सदस्यांचे नाव पुकारले, ज्या सन्माननीय सदस्यांचे नाव पुकारले गेले ते सभागृहात उपस्थित आहेत. परंतु त्यांनी आपली विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित केली नाही. सभापती महोदय, विरोधी पक्षाचे सदस्य सभागृहाच्या कामकाजात भाग का घेत नाहीत याची दखल घेणे आवश्यक आहे व यासंबंधी त्यांना आपण विचारणा केली पाहिजे आणि त्यासंबंधीची माहिती आपण सभागृहाला दिली पाहिजे, अशी माझी आपणास विनंती आहे.

उपसभापती : विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करण्याविषयी सन्माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर यांचे नाव मी पुकारले होते. परंतु त्यांचे समाधान झाले असेल त्यामुळे त्यांनी आपली सूचना उपस्थित केली नाही, असे मला वाटते.

आता सभागृहाची बैठक दुपारी 4.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.21 ते 4.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

पृ.शी.: (पुरवणी) विनियोजन विधेयक

L.A.BILL NO. VI OF 2008.

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY FIRST DAY OF MARCH 2008).

डॉ. सुनील देशमुख (अर्थ राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2008 चे वि.स.वि. क्रमांक 6 - दिनांक 31 मार्च 2008 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यास अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड(1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत. सदनाचे कामकाज थोडा वेळ स्थगित करु या.

उपसभापती : 5 मिनिटात कॅबिनेट मंत्री सदनात आले नाहीत तर पुरवणी विनियोजन विधेयक उद्या चर्चेला घेण्यात येईल.

यानंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(कॅबिनेट मंत्री सभागृहात आल्यानंतर)

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उपसभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उपसभापती : ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अर्धातास चर्चेसंबंधी.

उपसभापती : आजच्या कार्यक्रमपत्रिकेवरील चारही अर्धातास चर्चेच्या सूचना पुढे ढकलण्यात येत आहेत.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या मंगळवार, दिनांक 25 मार्च, 2008 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 04 वाजून 09 मिनिटांनी मंगळवार, दिनांक 25 मार्च, 2008 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही